


म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १३८८.
१८५८
REFBK-0009395
REFBK-0009395

९६५७

दा. क्र.
६३६५

# मध

( कवितासंग्रह )

REFBK-0009395

कवयित्री

ललित-कुमारी भट,

एम्. ए.

किंमत १ रुपये

★ सर्व हक्क ललित-कुमारी भट यांच्या स्वाधीन.

★ १ ली आवृत्ति : प्रति १०००.
★ जून १९५७.

★ **मुद्रक :**

म. न. पालवणकर
किर्लोस्कर प्रेस
किर्लोस्करवाडी,
द. सातारा.

★ **प्रकाशिका :**

ललित-कुमारी भट, एम्. ए.,
यशोवर्धन प्रकाशन,
टिळक चौक,
बेळगांव.

To

My Darling

Honey-bunch

from

Loving Bee

Belgaum,
31st May 1957

# सर्वोत्तम

सर्वोत्तम का माझ्या कविता ?
निर्णय रासिकांवरी सोंपवा !
आहे ठाउक एकच मजला
सर्वोत्तम हा सखा मदिय हो !

सर्वोत्तम हा सखा मदिय जरि
बरोबरीं तो दावुं कशी मी ?
म्हणुनी माझीं ' मधाळ ' कवनें
गुंफियलीं एकत्र आज मीं.

गोड मधुर कवनांचा माझा
गुच्छ मनोहर हुंगुनि रसिका
पहा मुदें तूं सख्यासवें मज
तेजें अमुच्या दिपुनी जा रे.

मोहक अमुच्या ऐक्याचा अजि
ऐकावा संदेश दिव्य तूं
आणि 'मधा'च्या पुण्यप्रभावें
तूंही सहजीं पावन व्हावें !

सखा लाभला सर्वोत्तम मज
तुम्हांहि त्याच्या श्रेष्ठत्वाचें
व्हावें दर्शन अल्पस्वल्प तरि
म्हणुनी हा ' मध ' अवतरलाहे !

*खराखुरा ‘ मध ’ माझ्यासाठीं*
*ग्रंथरूप हा तुम्हांसाठीं*
*माझें मजला– तुमचें तुम्हां*
*गोडच अवघें घ्यावें मानुनि !*

*असाल जर का तुम्हीं जाणते*
*द्या द्या आम्हां आशिर्वादहि*
*असाल जर का तुम्ही नेणते*
*अमुचा मनिं आदर्श बाळगा.*

*असाल जर समवयस्क तुम्हीं*
*व्हा व्हा अमुचे स्नेही·सोबति*
*या सारे आबालवृद्धही*
*वाचाया ‘ मध ’ भरवा मेळा !*

**–ललित-कुमारी भट.**

ता. ३१–५–५७

# कवितांचा क्रम


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | रे हवें लढाया | ... | ... | ३ |
| २ | होम पेटता ह्या हृदयामधिं | | ... | ५ |
| ३ | सांभाळुनि घे ह्या भोळीला | | ... | ७ |
| ४ | खुळ्या मना परि अजुनि वाटतें ! | | ... | ९ |
| ५ | तुझ्याकडुनि मी शिकेन ममता ! | | ... | ११ |
| ६ | देशील ना एकसवें ? | ... | ... | १३ |
| ७ | तसूंतसूंनी पुण्य जोडते ! | ... | ... | १५ |
| ८ | शुद्ध देवता | ... | ... | १७ |
| ९ | निखार पदतळिं – अमृत माथीं ! | | ... | १९ |
| १० | वज्रहार | ... | ... | २१ |
| ११ | गोड मधाचा अमूप सांठा | | ... | २३ |
| १२ | मध | ... | ... | २५ |
| १३ | स्थैर्य | ... | ... | २६ |
| १४ | असीम मित्रत्वाचें दालन | | ... | २७ |
| १५ | संक्रमण | ... | ... | २९ |
| १६ | संजीवनी | ... | ... | ३१ |
| १७ | नको ठोकरूं | ... | ... | ३३ |
| १८ | तिळगूळ | ... | ... | ३५ |
| १९ | अपरिमित ही | ... | ... | ३७ |
| २० | झांकशील तूं सूर्य कसा रे ? | | ... | ३९ |
| २१ | सरल निरागस भोळा होउनि | | ... | ४१ |
| २२ | बागिचा | ... | ... | ४३ |
| २३ | भाग्यलक्ष्मी | ... | ... | ४५ |
| २४ | राधेखातर हो रे मोठा | ... | ... | ४७ |
| २५ | तझ्या मोहनास्त्रांनीं तूं रे ! | | ... | ४९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | गोड मधाच्या जगांत अतुल्या | ... | ५१ |
| २७ | बांसरी | ... ... | ५३ |
| २८ | मधाचा चंद्र | ... ... | ५५ |
| २९ | कोकिळा | ... ... | ५७ |
| ३० | मधाचा पूल | ... ... | ६० |
| ३१ | शांत मनानें घेऊं अनुभव | ... | ६३ |
| ३२ | आणशील ना बळ सिंहाचें ? | ... | ६६ |
| ३३ | महति शुद्धतम चारित्र्याची | ... | ६८ |
| ३४ | पुण्यच मम साकार जाहलें ! | ... | ७० |
| ३५ | घरटें | ... ... | ७२ |
| ३६ | अमुक्त | ... ... | ७४ |
| ३७ | उणावेल का मधुरतेज तें ? | ... | ७६ |
| ३८ | त्या कलिकेची निष्ठा राजा ! | ... | ७८ |
| ३९ | बंद लिफाफा | ... ... | ८० |
| ४० | वरदाक्षिणा | ... ... | ८२ |
| ४१ | आण | ... ... | ८४ |
| ४२ | अनुपम जोडी | ... ... | ८६ |
| ४३ | अमोल कंठा | ... ... | ८८ |
| ४४ | समृद्ध ओंजळ | ... ... | ९० |
| ४५ | षोडषवर्षी युवक कोंवळा | ... ... | ९२ |
| ४६ | अष्टपैलू | ... ... | ९४ |
| ४७ | फुलदाणी | ... ... | ९६ |
| ४८ | पूर्ति | ... ... | ९८ |
| ४९ | तेजोस्फुल्लिंग | ... ... | १०० |
| ५० | सुखशय्या | ... ... | १०२ |
| ५१ | मऊ सुई | ... ... | १०४ |
| ५२ | मानाचें पान | ... ... | १०६ |

५३ प्रपंचगड ... ... १०८
५४ सूर्यकिरण तूं – चंद्रकला मी ... ११०
५५ ह्या मैनेची चोंच बोलकी... ... ११२
५६ आतुरता आणि तृप्ति ... ... ११४
५७ खपुष्प ... ... ११६
५८ अभय-वचन ... ... ११८
५९ दिव्यास जळत्या साक्ष ठेवुनी ... १२०
६० मधामधिंच तवें सारें सारें ... ... १२२
६१ अरुणोदय ... ... १२४
६२ तशीच तुजसम हंसुनी फसतें ! ... १२६
६३ साखरपुडा ... ... १२८



ललित-कुमारी भट.

२२११६ ३८८

क्रमांक ...१३८७... नों. दि. ३।८।८७.

22776 दि. 3/05
क्रमांक 7386 नों. दि. 37/8/58
ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. 8364
(स्थळ प्रत)

# रे हवें ळढाया...

थांबलें तरुतळीं विश्रामास्तव राजा
शिणभार जाहला सारा माझा हलका
परि असेंच सखया कुठवरि थांबूं राजा ?
रे हवें जावया– वाट पुढिल चालाया.

हें रखरखलेलें ऊनचि माथ्यावरती
रे संगत तुझि परि झुळुक मंद वाऱ्याची
परि चंचल मारुत कुठवरि मज लाभेल ?
रे हवें जावया-- तप्त भुई तुडवीत.

ही पायवाट तोडितां कंठ सुकला रे
तूं निर्झर सुंदर– देशी मज पाणी रे
परि असेंच कुठवरि पाणी पीतच बैसूं ?
रे हवें जावया मार्ग पुढिल शोधाया.

हें ढगाळलेलें नभ रे डोईवरती
तो स्नेह तुझा परि इंद्रधनुष्याचि भंवतीं
क्षणभंगुर किमया कुठवरि टिकेल राया ?
हे कृष्णमेघ पाहणेंच नशिबीं राजा !

रे प्रणय आपुला ऊंसच ताजा ताजा
तो मुळापासुनी गोडच सगळा सगळा
परि असाच चघळित कुठवरि बसशिल राजा ?
हा चोथा तरि रे हवाच ना फेंकाया ?

ही वाटचाल खडकाळचि माझी सारी
रे प्रीत तुझी मखमली पायघडिपरि ती
परि पायघडी तुझि कुठवरि रे पुरणार ?
खडकांतच पुन्हां हवा पाय टेकाया.

पदतळीं माझिया पाल्यापाचोळा रे
अन् प्रीत तुझी ताटवे गुलाबांचे रे
सुकुमार फुलें परि कुठवरि टिकतिल राजा ?
निर्माल्यचि त्यांनीं हवें व्हावयाला रे !

रे जीवन अपुलें संग्रामाचि घनघोर
अन् प्रीत तुझी तहनामा जणुं शांतीचा
तहनामा कागदि कुठवरि रे टिकणार ?
रे हवें लढाया– पुन्हां जीव तोडून !

ता. ११-१०-५६

# होम पेटता ह्या हृदयामधिं !

आसूंची मम वाहति गंगा
अडवुनि कुठवरि धरशिल राजा ?
दु:खाचे कढ ऊन ऊन हे
उगाच कुठवर रोखशील रे ?

शोकाचे मंदार मेरु हे
दूर तयां कुठवरी सारशिल ?
वादळवारा सुस्काऱ्यांचा
कुठवरि राजा साहशील रे ?

तप्त धरित्री - थेंब जलाचा
टिकेल कुठवरि सांग राजसा
व्याकुळ मी तव प्रीती कंवळी
पुरेल मज कुठवरी राजसा ?

वैफल्याच्या वाळुकणांमाधिं
सुवर्णकण कुठवरी शोधशिल ?
हताश मी– उन्मेष तुझा मज
सांग सख्या कुठवरी हांसविल ?

रात्र काजळी– तारा इवला
कुठवरि राजा उजळुनि टाकिल ?
प्रणय तुझा ह्या व्यथित अंतरा
कुठवरि राजा फुलवुनि देइल ?

ही वाटचाल खडकाळचि माझी सारी
रे प्रीत तुझी मखमली पायघडिपरि ती
परि पायघडी तुझि कुठवरि रे पुरणार ?
खडकांतच पुन्हां हवा पाय टेकाया.

पदतळीं माझिया पालापाचोळा रे
अन् प्रीत तुझी ताटवे गुलाबांचे रे
सुकुमार फुलें परि कुठवरि टिकतिल राजा ?
निर्माल्यचि त्यांनीं हवें व्हावयाला रे !

रे जीवन अपुलें संग्रामाचि घनघोर
अन् प्रीत तुझी तहनामा जणुं शांतीचा
तहनामा कागदि कुठवरि रे टिकणार ?
रे हवें लढाया– पुन्हां जीव तोडून !

ता. ११–१०–५६

# होम पेटता ह्या हृदयामधिं !

आसूंची मम वाहति गंगा
अडवुनि कुठवरि धरशिल राजा ?
दु:खाचे कढ ऊन ऊन हे
उगाच कुठवर रोखशील रे ?

शोकाचे मंदार मेरु हे
दूर तयां कुठवरी सारशिल ?
वादळवारा सुस्कार्‍यांचा
कुठवरि राजा साहशील रे ?

तप्त धरित्री- थेंब जलाचा
टिकेल कुठवरि सांग राजसा
व्याकुळ मी तव प्रीती कंवळी
पुरेल मज कुठवरी राजसा ?

वैफल्याच्या वाळुकणांमाधिं
सुवर्णकण कुठवरी शोधशिल ?
हताश मी- उन्मेष तुझा मज
सांग सख्या कुठवरी हांसविल ?

रात्र काजळी- तारा इवला
कुठवरि राजा उजळुनि टाकिल ?
प्रणय तुझा ह्या व्यथित अंतरा
कुठवरि राजा फुलवुनि देइल ?

होम पेटता ह्या हृदयामधिं
स्नेहाचें घृत तूं अर्पावें
विझेल का ज्वाला धगधगती ?
छे छे ! अधिकच भडके रे ती !

ता. १५-१०-५६

# सांभाळुनि घे ह्या भोळीला

तुझ्या प्रीतिचीं माणिकमोतीं
कशास उधळिसि माझ्यावरती ?
लगबग वेंचुनि घ्यायालाही
खरेंच नाहीं हुरुप राजसा.

भरजरि शेला तव प्रणयाचा
लपेटशी कां माझ्याभंवतीं ?
सांवरुनी तो घ्यायाचीही
खरेंच नाहीं शुद्धहि मजला.

कशास राजा लाविशि ओठीं ?
शृंगाराचा अमृतपेला
घुटका घेण्याचेंही राजा
भानच उरलें नाहीं मजला.

जाइजुई प्रेमळ स्पर्शाचीं
अलगद उडविशि अंगावरती
मोहरण्याही परंतु राजा
खरेंच कीं रे विसरुनि गेलें.

मंगलमणि नवथर प्रेमाचा
बांधिलास तूं गळ्यांत राजा
अभिमानानें ऊर फुगाविण्या
खरेंच ना उल्हासहि उरला.

घातलेस तूं करांत माझ्या
वज्रचुडे रे चिर ममतेचे
भाग्यानें ह्या हुरळुनि जावें
एवढेंहि ना कळलें मजला.

मधु वचनांच्या आभरणांनीं
दिलेंस मज नखशिखांत नटवुनि
तेजानें त्या दिपण्याची परि
खरेंच नाहीं अक्कल मजला.

कवळिलेंस तूं आवेगें मज
समरसणें परि जमलें नाहीं
परंतु राजा-- सख्या जिवलगा
सांभाळुनि घे ह्या भोळीला !

ता. १६–१०–५६

# खुळ्या मना परि अजुनि वाटतें !

कांटेरी मम मार्गावरती
ओतिलीस तूं रास फुलांची
खुळ्या मना परि अजुनि वाटतें
पायीं कांटा खुपतच आहे.

पुसुनी माझ्या अश्रूधारा
फुलविलेंस तूं मनीं चांदणें
खुळ्या मना परि अजुनि वाटतें
कुठेंतरी कळ उठतच आहे.

तृषार्त माझ्या कंठामध्यें
अमृतघट तूं करिशि रिकामे
खुळ्या मना परि अजुनि वाटतें
कंठ कोरडा पडतच आहे !

थंडीनें मीं कांकडतांना
दिलीस शेकोटी प्रणयाची
खुळ्या मना परि अजुनि वाटतें
हुडहुडि थोडी भरतच आहे.

वादळवाऱ्यामधिं फिरतांना
तुझा प्रीतिप्रासाद लाभला
खुळ्या मना परि अजुनि वाटतें
वारा अंगा झोंबत आहे.

कृष्णरात्र अवसेची संपुनि
कधिंच उगवली उषा हांसरी
खुळ्या मना परि अजुनि वाटतें
निशा काजळी उरली आहे.

उजाड माळावरती राजा
उमलविला तूं बागबगीचा
खुळ्या मना परि अजुनि वाटतें
जमिन कुठेंतरि ओसच आहे !

अणुरेणू ह्या हृदयामधला
व्यापिलास तूं राजा आतां
खुळ्या मना परि अजुनि वाटतें
पोकळि इवली शिल्लक आहे !

ता. १८-१०-५६

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
मध... अनुक्रम २२११५ वि: ९१०५ ...११
क्रमांक ११३८८ नों: दि: ३११८१५८

# तुझ्याकडुनि मी शिकेन ममता !

वज्रापरि मी कठिण कठिण रे
नवनीतापरि मृदुल मृदुल तूं
तुझ्यासवें मज ये कोमलता
माझ्याकडुनी शीक टणकता.

अग्नीपरि मी प्रखर प्रखर रे
बर्फापरि तूं शीतल शीतल
तुझ्यासवें मी गारच होइन
माझ्याकडुनी शीक तप्तता.

वाऱ्यापरि मी स्वैरचि चंचल
आणि अचळ तूं सह्यगिरीपरि
तुझ्यासवें मज येई स्थिरता
माझ्याकडुनी शीक तरलता.

बिजलीपरि मी चपळ चपळ रे
अनंत आकाशापरि तूं रे
तुझ्यासवें मज विशालता ये
माझ्याकडुनी शीक चपळता.

दर्यापरि मी उफाळतें रे
आणि शांत तूं किनाराच जणुं
तुझ्यासवें मज येइ तृप्तता
माझ्याकडुनी शीक रौद्रता.

प्राजक्तापरि मंदमधुर तूं
आणि केतकी धुंदच मी रे
तुझ्यासवें मज येइ सौम्यता
माझ्याकडुनी घे मादकता.

प्रज्ञेच्या खडकांत लोपले
माझ्या प्रीतीचे पाझर रे
नवथर कंवळ्या तुझ्या प्रीतिला
धरणचि माझ्या प्रज्ञेचें रे.

बुद्धीची मम हृदयावरती
घट्ट पकड रे तूंच ढिली कर
तुझ्याकडुनि मी शिकेन ममता
तूंहि रुक्ष हो जरा मजसवें !

ता. १९-१०-५६

# देशील ना एकसवें ?

राया तुझ्या प्रीतीचे रे
धागे किती कोमल ते
सांग त्यांना पेलेल कां ?
ओझें माझ्या गरजांचें !

राया मला हवें आज
सारें- सारें- सारें- सारें !
इवल्याशा हातांनीं तूं
कसें राजा देशील तें ?

कोंवळा तूं सखा राजा
प्रीत तुझी रे कंवळी
आणि माझ्या अंतरींची
व्यथा सख्या रे आगळी !

सान बाळापरी राजा
मन झालें हळवें रे
देशील का लाडक्या तूं ?
हात मऊ वत्सल ते.

भरलेल्या घरांत रे
वाटे मला पोरकी मी
सारीं एका सांच्यांतलीं
एकटीच वेगळी मी.

तूंच हो रे माझी माता
तूंच हो रे पिता माझा
तूंच हो रे बंधू माझा
आणि भगिनीही तूंच !

एकुलता लाडका तूं
मैतर हो जीवाचा ह्या
आणि कर गुंफण तूं
साऱ्या साऱ्या नात्यांची ती !

लाडक्या रे वेल्हाळा--रे
भाव तुझ्या प्रणयाचे
अपुरेच मला राजा
हवें मज सारें--सारें.

राया मला हवें आज
सारें-- सारें-- सारें-- सारें
इवल्याशा हातांनीं तूं
देशील ना एकसवें ?

ता. १०-११-५६

# तसूंतसूंनी पुण्य जोडते !

खरेंच बघ ना मंदाताई
कधीं कधीं ग मला वाटतें
हंसी मी अन् माझ्याभंवतीं
मोतीचारा पडला आहे.

तूंच सांग ग मंदाताई
मोतीचारा कुठवर खाऊं ?
हवी मला ग पहावया चव
निशिदिनिं जें तुम्हि चाखित बसतां.

पहा पहा ग मंदाताई
पवित्र मंदिर माझ्याभंवतीं
धूपारति अन् घंटानादें
जीव गडे ग उबगुनि गेला.

येऊं दे ग मंदाताई
घडिभर मजला तुम्हांमध्यें
खरेंच जाइन मुदें परतुनी
पुन्हां माझ्या मंदिरांत मी.

घडिभर तुम्हांमधें मिसळतां
उणावेल का देवपणा हा ?
छे छे सखये दुणावेल ग
अद्भुत तेजोवलयचि माझें.

त्यागामधली भोगलालसा
कणाकणांनीं पुण्य जाळते
विरक्ति परि ती भोगामधली
तसूतसूंनीं पुण्य जोडते.

पहा पहा ग मंदाताई
त्यागाचा मी हिमगिरि चढलें
भोगानें ना पडेन कधिं मी
अधिकच उंचावेन सखे ग.

खरेंच बाई मंदाताई
विसरूं दे मज 'देव'पणा हा
घडिभर होइन मानव मीही
घडिभर होइन तुम्हांसारखी !

ता. १५-१२-५६

# शुद्ध देवता

कळलें बाई मंदाताई
कळलें आतां कळलें पुरतें
बीजें दैवी माझ्यामधलीं
तुम्हां 'देव'पण देवुनि जाती.

सद्‌गुण माझे परिसापरि ग
सदाचेच ते मला चिकटले
लोह कुणीं मजजवळ पाततां
सुवर्णमय तो बनुनी जाई.

पहा पहा ग मंदाताई
लोह कधीं मज दिसतच नाहीं
तिन्ही त्रिकाळीं माझ्याभंवतीं
शंभर नंबरी सोनें असतें.

माझिच किमया मीच पहातें
कौतुक कुठवरि करित बसावें ?
लोहहि जर सोनेंच मजसवें
अस्सल पारख कशी करावी ?

खरेंच आतां मंदाताई
भारभूत हा 'देव'पणा मज
सामान्यांचीं सुखदु:खेंही
हवीं मला समजावुनि घेण्या.

त्यागामधली भोगलालसा
कणाकणांनीं पुण्य जाळते
विरक्ति पारि ती भोगामधली
तसूतसूंनीं पुण्य जोडते.

पहा पहा ग मंदाताई
त्यागाचा मी हिमगिरि चढलें
भोगानें ना पडेन कधिं मी
अधिकच उंचावेन सखे ग.

खरेंच बाई मंदाताई
विसरूं दे मज 'देव'पणा हा
घडिभर होइन मानव मीही
घडिभर होइन तुम्हांसारखी !

ता. १५-१२-५६

# शुद्ध देवता

कळलें बाई मंदाताई
कळलें आतां कळलें पुरतें
बीजें दैवी माझ्यामधलीं
तुम्हां 'देव'पण देवुनि जाती.

सद्‌गुण माझे परिसापरि ग
सदाचेच ते मला चिकटले
लोह कुणीं मजजवळ पाततां
सुवर्णमय तो बनुनी जाई.

पहा पहा ग मंदाताई
लोह कधीं मज दिसतच नाहीं
तिन्ही त्रिकाळीं माझ्याभंवतीं
शंभर नंबरी सोनें असतें.

माझिच किमया मीच पहातें
कौतुक कुठवरि करित बसावें ?
लोहहि जर सोनेंच मजसवें
अस्सल पारख कशी करावी ?

खरेंच आतां मंदाताई
भारभूत हा 'देव'पणा मज
सामान्यांचीं सुखदु:खेंही
हवीं मला समजावुनि घेण्या.

हवीं गडे समजावुनि घेण्या
हवीं मला तीं स्वतः भोगण्या
परंतु सखये कुणींच मजला
खालीं उतरूं देतच नाहीं.

जे जे येती ते ते सगळे
स्वयेंच वरती चढुनी येती
हात मागतें मदतीचा मी
एक पायरी खालीं येण्या.

स्नेही माझे भोळेभाले
'दैवी' आतां बनुनी गेले
उच्चासनिं मज ठेविति जखडुनि
म्हणाति रहा ग शुद्ध देवता !

ता. १७-१२-५६

# निखार पदतळिं – अमृत माथीं !

पहा पहा ग मंदाताई
पायदळीं मम निखार फुलला
आणि पहा ग डोईवरती
शीतल तोषद अमृतधारा.

पहा पहा ग मंदाताई
उरीं दाटले कढ दुःखाचे
आणि पहा ग गालांवरती
गोड काश्मिरी गुलाब फुलले.

पहा पहा ग मंदाताई
अधरीं नाचे गीत तृप्तिचें
आणि पहा ग जिव्हेनें ह्या
अतृप्ती हालाहल गिळिलें.

पहा पहा ग मंदाताई
नेत्रीं माझ्या फुले चांदणें
आणि पहा ग मंदाताई
पापण्यांत ह्या पूर आसुंचे.

पहा पहा ग मंदाताई
शेला माझा सौभाग्याचा
आणि पहा ग आंत दडविलीं
जीर्ण लक्तरें कमनशिबाचीं.

पहा पहा ग मंदाताई
सोनेरी हा सौख्य-मुलामा
आणि पहा ग आंत लपविलें
पितळच सगळें भम्राशांचें.

कशास अमृतधारा माथीं ?
निखार जर त्यां ये न विझविण्या
निखार तरि हा कशा पदतळीं ?
अमृत जर त्या ये न जाळण्या.

निखार पदतळिं-- अमृत माथीं
सवेंच दोन्ही- ना सोसत मुळिं
घ्या ना काढुनि- घ्या ना झडकरि
एकतरी घ्या पुरें काढुनी !

ता. १८-१२-५६

# वज्रहार

हिरकणी मी अन् सोबति माझे
हिरेच बाई अस्सल दुर्मिळ
परंतु अमुचा हार बनविण्या
हवें अम्हां ना सोनें थोडें ?

सोनें थोडें शंभर नंबरी
तेंही आम्हां कुठें मिळेना
अफाट पृथ्वीच्या पाठीवरि
भेसळ सगळी भरुनि राहिली.

असतों जर का पुष्पें सुंदर
आलों असतों सहजीं जवळीं
इवलासा धागाहि सुताचा
आम्हांला ग पुरला असता.

आणिक जर का असतों मोतीं
तार बारकी कसली तरि ग
सहजीं आम्हांमध्यें शिरुनी
माळ गुंफण्या धजली असती.

परंतु आम्ही वज्रमणी ग
अमोल आणिक तेजस्वी ग
वज्रहार नेटका घडविण्या
कारागीरहि कुशल हवा ग.

बावनकशी उत्तम सोनें ग
कारागीरहि चतुर जाणता
हवा अम्हां ग हवा आजला
हार आमुचा तयार करण्या.

हिरकणी मी अन् सोबति माझे
हिरेच बाई अस्सल दुर्मिळ
कराल जर तुम्हि वज्रहार ग
चमकूं आम्हीं एकदिलानें.

चमकूं आम्हीं एकदिलानें
तेज दिगंतीं देऊं पसरुनि
परंतु हारामधिं जुळण्याची
अजुनी संधी मिळतच नाहीं !

ता. २७–१२–५६

# गोड मधाचा अमूप सांठा

साक्ष ठेवुनी मावळतीला
शपथ घेतली कालच मीं ग
दु:खानें ना खचायचें कधिं
हंसावयाचें सदा तोंडभर.

मनुजाविण ह्या अफाट जगतीं
हंसणारा ना प्राणी दुसरा
भाग्यानें हा देह लाभला
उगाच कां तो शिणवावा मीं ?

छे छे नाहीं-- कधींच नाहीं
कधींच ना ग रडावयाची
हंसेन आतां रोजच मी ग
हंसेन आणिक गोडच बोलिन.

सुंदर भाषा-- हास्य गोडसें
दैवानें ज्या दिल्या देणग्या
उगाच कां दुरि साराव्या मीं ?
छे छे घेइन कवटाळुनि ग !

आज उगवती नववर्षाची
साक्ष ठेवुनी ह्या सूर्याला
पुन्हां सांगतें-- पुन्हां म्हणतें
रोजच आतां हंसावयाचें.

वर्ष जुनें तें मिटतांना मीं
सहज घेतला आढावा ग
मावळतीच्या मंद प्रकाशीं
सुखदु:खें मीं नीट मापिलीं.

रडलें बाई -- रडलें मी ग
वेडें मन हें रडतच बसतें
परंतु खुळि मी कशी विसरलें ?
गोड मधुर मध माझ्याभंवतीं !

गतवर्षी मज हळुच गवसला
गोड मधाचा अमूप सांठा
जिव्हेवरती गोडी ती ग
आणि आसुंनीं भिजूं कशाला ?

ता. १-१-५७

# मध

फुलांफुलांवर बागडणारें
चंचल मी फुलपांखरूं नव्हे
मधमाशी मी एकनिष्ठ रे
आणिक तूं मध माझा केवळ.

मधमाशी ना कधीं चुकुनिही
मधास अपुल्या विसंबायची
तशीच मी रे कल्पांतींही
तुला सोडुनी ना जायाची.

रागवशी कां अतां राजसा ?
मंद गती प्रणयांतिल पाहुन !
पिऊं कशी ह्या मधा गटागट ?
हळूहळू तो हवा चाखण्या.

गोड गोड मध गोडच तूं रे
मधमाशी मी तुला चिकटलें
गोडी तुझि ह्या जिव्हेवरती
सदाच आतां सदाच बघ रे !

ता ८-१-५७

# स्थैर्य

घट्ट पकड तुझिया हाताची
सुनावते मज नीट निक्षुनी
'स्थिर स्थिर हा कोमल कर गे
केवळ आतां माझ्या हातीं !'

असती जर का ढिली थोडिशी
पकड घट्ट तुझिया हाताची
घुटमळलें रे असतें मन हें
भूतभविष्यामाजि कदाचित्.

परंतु तुझिया स्थिर नजरेनें
दिलेंस तूं रे स्थैर्य मलाही
नाहिं पाहिली कधीं चुकुनिही
नयनीं मीं रे तुझ्या आर्तता.

ना व्याकुळता नेत्रीं तुझिया
शांत तृप्त रे मीहि तुजसवें
प्रणयाकुल व्हावया राजसा
खरेंच कीं रे विसरुनि गेलें !

ता. ९–१–५७

# असीम मित्रत्वाचें दालन

भिरभिरणाऱ्या भोळ्या हृदया
तूंच रोखिलें स्थिर नजरेनें
थरथरणाऱ्या भोळ्या हाता
तूंच दाबिलें रे जोरानें.

नवथर कंवळ्या स्पर्शीं तुझिया
नव्हता रे आवेग क्षणिक तो
आणिक नव्हता जोमहि उसना
स्पर्शानें मम ओसरणारा.

घेतांना हा हात करामधिं
त्रिचकलास ना– दचकलास ना
हास्यमुखानें दिलेंस खोलुनि
असीम मित्रत्वाचें दालन.

असीम मित्रत्वाचें दालन
खोलिलेंस ह्या भोळीसाठीं
तृप्तीनें मी फिरूं लागलें
विशाल तुझिया दालनांतुनी !

विशाल तुझिया दालनांत रे
रत्नखचित किति होतिं आसनें
घट्ट बिलगुनी तुला राजसा
सर्वांवरि मीं बसुनि पाहिलें.

सिंहासन राजा- राणीचें
बसलों तेथें नवल नसे मुळिं
परंतु बघ ना इतर आसनीं
भिन्न भिन्न रूपें वावरशी.

इचल्या तुझिया नयनांतच मीं
मातेचें वात्सल्य पाहिलें
भगिनीचें सौहार्द पाहिलें
आणि पित्याची जरब पाहिली.

एकुलता तूं मित्र कोंवळा
होशि बंधुपरि पाठीराखा
इचल्याशा खांद्यावरि साऱ्या
नात्यांचा तूं भार वाहिला !

ता. ९-१-५७

# संक्रमण

संक्रांतीच्या मधु समयाला
करूं संक्रमण कसलें रे ?
सांग लाडक्या - सांग जिवलगा
झेलिन मी तें मस्तकिं रे.

तुला पाहतां– तुला भेटतां
मिटला अलगद भूतकाळ तो
चिंता नुरली भविष्याचि रे
एक जागता वर्तमान तो.

एक जागता वर्तमान तो
तुझ्याचमध्यें हांसत आहे
तुझ्याचमध्यें डोलत आहे
तुझ्याचमध्यें चमकत आहे.

एक जागता वर्तमान तो
तुझ्याचभंवतीं रे सुकुमारा
स्वप्नें सारीं काल उद्यांचीं
तुझ्याचमध्यें मूर्त जाहलीं.

लोभस गोंडस रूप तुझें तें
सरल नासिका सरल सरल ती
वर्तुळ इवलें ओंठांचें तें
आणिक नयनीं हिरे तळपते.

अंगकांति काश्मिरी गुलाबी
मृदुल मृदुल ते कुंतल रेशमि
नसांनसांतुनि भाव निरागस
प्रकटत आहे– शोभत आहे.

अशा लाघवी रूपा पाहुनि
प्रथमदर्शनीं होई संक्रमण
भूतकाळ निमिषार्धीं दडपुनि
उंच उडी तुझिया हृदयावरि.

उंच उडी तुझिया हृदयांवरि
स्थिर स्थिर मी तिथेंच आतां
संक्रांतीला पुन्हां कराया
दुजें संक्रमण नुरलें राजा !

ता. १४–१–५७

# संजीवनी

गुणी सुशिल मी– शांत सरल मी
अंतर माझें मृदुल भाबडें
आणि तरी अंगार कोठला ?
लपेटुनी रे तुम्हांस जातो.

माझी मजला नाहीं जाणिव
नाहीं कळतच माझें मजला
शीतल स्नेहल प्रीतींतिल मम
ठिणगी कुठली जाळी तुम्हां ?

मत्प्रीतीची दिव्य हिरकणी
जीवघेणि कां भासे तुम्हां ?
आषक होऊनि झडप घालतां
नैराश्यें कां मागुति फिरतां ?

येतांना तुम्हि येतां हांसत
सुमनांचे मधु झेले उधाळित
परंतु मागुनि फिरतांना रे
आसूंचे ते पूर भयानक.

सख्या लाडक्या– दिलास तूं मज
गोड मधाचा अमूप सांठा
भोळ्या माझ्या मना वाटलें
कधींच ना मध संपायाचा.

मधांतही परि विखार शिरला
कुठुनि ? कसा ? अन् कधीं ? कळेना।
आणि आज तूं जाशी परतुनि
ओशाळे ते ओठ मुरडुनी.

जायाचें तर जा जा सखया
अटळच राजा होणारें हें
प्रदीर्घ तुझिया निःश्वासांनीं
नको जाळुं परि माझ्या हृदया.

जातांनाही जा जा हांसत
त्याच स्मृतीवर जगेन मी रे
त्रस्त व्यथित ह्या मना हवी अजि
हास्याची तव संजीवनि रे !

ता. १६–१–५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
मध... अनुक्रम २२९९६ वि: ३८०५ ३२
क्रमांक ९३८० नों: दि: ३१/८/५८

# नको ठोकरू

आवर माझ्यासाठीं राजा
आसूंचे ते पूर भयानक
तूंच फुलविली बाग मदंतरिं
नि:श्वासांनीं नकोस सुकवूं.

सारा अपुला जीव ओतुनी
कौशल्यहि तें पणा लावुनी
सुखद मनोरम पुष्पवाटिका
दिलीस तूं मजसाठीं निर्मुनि.

ठायीं ठायीं कुंज मनोहर
मधुर आपुल्या सहवासाचे
फुलें सुरंगी नानाविध तीं
अमर प्रीतिच्या मधु वचनांचीं.

जायाचें तर हळुहळु जा रे
नको देउं तिळमात्र हादरा
प्रचंड अपुल्या प्रणयोद्याना
तुझ्या नि माझ्या प्रीतिवैभवा.

तूं गेल्यावर सहजीं राजा
छिन्न -- विद्ध हें होइल अंतर
परंतु ह्या उद्यानीं विहरुनि
भोळ्या माझ्या हृदया जगविन.

कुणि सांगावें ? तूंही अवचित
येशिल परतुनि एके दिवशीं
हवा सख्या ना – सांग राजसा
खुळा जीव तोंवरि जगवाया.

प्रीतीची संजीवनि प्राशुनि
अमर अतां रे तूं मी दोघें
कशास वेडे आसूं नयनीं ?
अमरच अपुलें सौख्य सख्या रे.

येशिल राजा – येशिल तूं रे
खरेंच राजा येशिल परतुनि
वैतागानें जातां जातां
नको प्रीतिचा मळा ठोकरूं !

ता. १६–१–५७

# तिळगूळ

गोड मधाला सांगूं कैशी ?
तिळगूळाची माधुरि बघण्या
गोड मधा मी देऊं कैशी ?
तिळगूळाचे दाणे इवले.

तिळगूळाची गोडी माझी
जाणवते जिव्हेला केवळ
परंतु तुझिया गोड मधाची
माधुरि माझ्या सर्वांगावरि.

सख्या -- जिवलगा तुझियाजवळीं
गोड मधाचा अमूप सांठा
शब्दांशब्दांमधें राजसा
शुद्ध मधाची अवीट गोडी.

हसतांनाही ओथंबे मध
तूं बघतां मज -- मधांत भिजतें
स्पर्शास्पर्शामधुनी तुझिया
मधाचेच रे झरे वाहते.

अशा अलौकिक मधास माझ्या
गोड बोलणें शिकवायाला
कशास सण तो संक्रांतीचा ?
कशास नाजुक साजुक हलवा ?

शुभ्र पांढरे दाणे माझे
छान शर्करी मधु हलव्याचे
तुझ्या मधाची शुचिता पाहुनि
मनांत अपुल्या लाजुनि गेले.

घे रे राजा -- घे रे आतां
दाणे माझे तिळगूळाचे
सरल भावड्या भोळ्या माझ्या
हृदयाचें हें प्रतीक बघ रे.

खुल्या मनानें सदा बोलतें
कांटेही कधिं बोंचतील रे
हलव्याचे ते कांटे समजुनि
तुझ्या मधानें भिजवुनि दे रे!

ता. १७-१-५७

# अपरिमित ही

मोह्क मादक तोषद दाहक
ह्या सर्वांहुनि पुरा वेगळा
ह्या सर्वांहुनि पुरा वेगळा
स्पर्श असा तव जाणवतो मज.

मोह्पटल तें जातें विरुनी
मादकताही ओसरते झणिं
तोषहि हळुहळु होई फिका
दाहकता तर जाळत जाई.

अमर चिरंतन असें कांहिंसें
अव्यक्तचि जें शब्दांमध्यें
जाणवतें मज -- जाणवतें मज
घडोघडीं अन् पदोपदीं रे.

आठवतो मज अजुनी पुरता
स्पर्श तुझा तो पहिलावहिला
आणि आजचा स्पर्श तुझाही
तसाच ताजा -- ताजा आहे.

त्या स्पर्शामधिं -- ह्या स्पर्शामधिं
तिळमात्रहि ना मुळीं भिन्नता
पहिल्यावहिल्या स्पर्शांतहि तव
जाणवला रे हाच जिव्हाळा.

अपरिमित ही प्रीती तुझि रे
संकेतांमधिं मावेना बघ
स्पर्शीं पहिल्या ना कातरता
आणि आज ना स्थितप्रज्ञता.

पहिल्या स्पर्शांतहि जाणवलें
अबाधित स्वामित्व तुझें तें
अजुनीही अतिपरिचयें तूं
अवज्ञा न कधिं करिशी राजा.

अमूप उत्कट तुझ्या प्रीतिनें
शृंगाराचे नियम मोडिले
मादक -- दाहक प्रीतीहूनहि
आगळि प्रीती तूंच शिकविली !

तां. १७-१-५७

# झांकशील तूं सूर्य कसा रे ?

कशास राजा यत्न फुकाचा ?
हृदया माझ्या छिन्न कराया
तुझ्याच लावावि प्रीतीचें रे
चिलखत माझ्या हृदयावरती.

गोड मधानें भिजलेल्या तव
मधु वचनांची पखरण येथें
अमूप गोडी विध्वंसाया
वाग्शर कोठुनि आणशील रे ?

वाग्शर अधरांतुनि सुटतांना
भोळे डोळे करिति लबाडी
आणिक नकळत बोथट -- बोथट
धार तुझ्या त्या शब्दांची रे.

कशास राया -- श्रमसी वायां
शब्द निरर्थक उच्चाराया
मादक प्रीतीशर चुकवाया
ढाल कशा पोकळ शब्दांची ?

शब्दांहुनिही अधिक बोलकीं
आयुधेंच किति तुझियाजवळी
इवल्याशा दो अधरांनीं कशि
वाचा त्यांची रोखशील तूं ?

निर्मळ लोचन प्रामाणिक तव
द्रुतगति त्यांची प्रणयोच्चारीं
सांग सांग अडविशील कैशी ?
ठिसूळ इवल्या शब्दांनीं रे.

तप्त नसा – मुखचंद्रीं लाली
धडधडतें उर -- थरथरते कर
उडत्या भिवयां – आतुर अधरहि
सांगुनि टाकति सारें सारें.

कशास राया ? उगिच लपविशी
भाषा सारी खुली खुली ही
इवल्याशा पंजांनीं तुझिया
झांकशील तूं सूर्य कसा रे ?

ता. १७–१–५७

# सरल निरागस भोळा होउनि

सरल नासिका तुझी राजसा
भाव सरल रे तुझा दाविते
आणि पताकास्थानच तें रे
सोज्ज्वल तुझिया सौंदर्याचें.

मृदुल मृदुल ते केस रेशमी
तुझ्या प्रीतिची कांति दर्शवी
आणि गुलाबी लालि कपोलीं
म्हणे किशोरच मी ग अजुनी.

लालचुटुक ते अधर कोंवळे
आणिक मिसरुड अस्फुट अस्फुट
सांगे मजला झाली घाई
खुणा बाल्यिच्या पुसावयाची.

सान वयामधिं उंची पुरती
म्हणे उच्च मी सर्वांहुनि ग
कणखर पंजे तुझे थोरले
म्हणति अतां मी नाहीं कंवळा.

सरल हांसणें – सरल पाहणें
सरल बोलणें -- सरल चालणें
सरल -- सरल रे सरल सरल तूं
सरलच राजा – सारा सारा.

प्रणयविद्ध ते कटाक्ष तिरपे
नाहिंत ठाउक तुला राजसा
आणि विकारी व्याकुळता ती
कधींच ना तुज जाणवली रे.

प्राजक्तापरि तांबुस गोरा
वर्ण तुझा तो सांगे मजला
'प्रीतहि माझी अशीच कोमल
जपुनि वाग ग -- जरा जपुनि ग.'

तुला पाहतां वाटे राजा
मदनच भूतळिं अवतरला रे
जुनीं आयुधें अपुलीं टाकुनि
सरल निरागस भोळा होउनि !

ता. १८-१-५७

# बगिचा

तुझ्या प्रीतिची कंवळिक चाखुनि
मीही बनलें कंवळी कंवळी
तुझी सरलता पाहुनि राजा
मीही नकळत सरलच बनलें.

गेलें विसरुनि डावपेंच ते
प्रणयांतिल अन् शृंगारांतिल
हात दाबतां तूं जोराने
नाहिं दाविला विरोध लटका.

पहिल्यावहिल्या स्पर्शांतहि रे
घट्ट पकड ती जाणवली मज
मुळीं न कळलें -- मुळीं न स्मरलें
हात तुझा हा नवखा -- परका.

पहिल्यांदाही जें न जाणवे
पुढें कधींतरि जाणवेल का ?
छे छे राजा -- छे छे सखया
खुशाल घे कर हा करिं राजा.

मंत्र अक्षतांनीं खुललेल्या
वरदेवापरि भासशि हंसरा
अधीर बावरि प्रीत चोरटी
तुझ्यामधें मीं कधिं न पाहिली.

नव्या लाजऱ्या प्रीतींतिल ते
सुस्कारे अन् दीर्घ उसासे
कंपित काया -- धुंद पापण्या
सहवासीं तव ना मज दिसल्या.

मदनाचीं हीं अस्त्रें बोंचक
तुझ्या निरागसतेला लाजलिं
आणि तुझ्या पहिल्या स्पर्शांतहि
शांति -- तृप्ति -- तुष्टी जाणवली.

प्रशांत प्रेमळ नेत्रांतुनि तव
सदा वर्षती अमृतधारा
आणिक माझ्या भोळ्या हृदयीं
साफल्याचा बगिचा फुलला !

ता. १८-१-५७

# भाग्यलक्ष्मी

खरेंच राजा -- सांग मला ना
प्रीत आपुली रुजली कैशी ?
प्रीत आपुली जुळली कैशी ?
प्रीत आपुली फुलली कैशी ?

प्रीत आपुली ताजी ताजी
पुरी न अजुनी वर्षाचीही
आणि तरी ह्या प्रश्नांचीं रे
आठवती ना मला उत्तरें.

पहिल्या भेटींतही वाटलें
जुना सुहृद मज भेटत आहे
आणि कालच्या भेटींतहि रे
तोच भाव तव कायम आहे.

तुझा नि माझा गाढ जिव्हाळा
कधींच नव्हता नवथर कंवळा
आणि अतां ह्यापुढें कधींही
शिळापुराणा ना होइल तो.

लोभस मोहक कमल--पुष्प जळिं
बीज तयाचें कुणीं पेरिलें ?
कुणीं फुलविल्या गोड पाकळ्या ?
सांग सांग ना सांग राजसा.

तशीच अपुली प्रीत लाडक्या
स्वयंभूच ती – स्वयंभूच ती
निर्मळ – मंगल – हृदयीं अपुल्या
प्रीतकमळ रे सहज उमललें.

ह्याच प्रीति-कमळांतुनि राजा
तुझी नि माझी भाग्य-लक्ष्मी
कशी प्रकटली ? अवतरली कशि ?
सांग सांग ना -- सांग जिवलगा.

तृप्ति-तुष्टिचे हंस भोंवतीं
कीर्तिहार घेउनी गज खडा
अशी आपुली भाग्यलक्ष्मी
तिन्ही-त्रिकाळीं सदा जागती !

ता. १९–१–५७

# राधेखातर हो रे मोठा

तुला भुलविण्याजोगें राजा
काय तुला मजपाशीं दिसलें ?
तुला झुलविण्याजोगें राजा
मोहनास्त्र मजजवळीं कुठलें ?

ना मुग्धेची अल्लडता रे
ना नवतीची नवी नव्हाळी
प्रसन्नता ना नवयुवतीची
ना आतुरता कामिनिची रे.

आणि तरीही -- आणि तरीही
मंत्रमुग्ध कां होउनि येशी ?
असा भारल्यापरि तूं राजा
पिंगा कां मजभंवतीं घालिशी ?

किशोर तूं रे कंवळा कंवळा
प्रणयभाव तव कंवळा कंवळा
प्रमदा मी रे पुरी जाणती
असा कसा रे आषक होशी ?

सांग लाडक्या -- सांग जिवलगा
कशी होउं तुजसवें किशोरी ?
तूंच बाळकृष्णापरि राजा
राधेखातर हो रे मोठा.

तुझ्या निरागस नेत्रांमधली
खुली खुली आसक्ती पाहुनि
नकळत मीही तुझ्यासवें रे
प्रणयातुर झणिं बनलें – बनलें.

नव्हतें कांहीं माझ्यापाशीं
मुळांत तुज चेतविण्याजोगें
परंतु भोळ्या तुझ्या प्रीतिनें
नकळत मज कामिनी बनविलें.

आणिक आतां नकळत मजला
लाभलि नवतीची नव्हाळी
मुग्धेची ती अल्लडता अन्
प्रसन्नता रे नवयुवतीची.

ता. १९-१-५७

# तुझ्या मोहनास्त्रांनीं तूं रे !

वैराग्याच्या भूमीमध्यें
आसक्तीचा झरा खोल मम
नीट खणुनि रे तया शोधणें
खरेंच राजा – नाहीं सोपें.

किशोर तूं रे कंवळा कंवळा
इवल्याशा हातांनीं कैसा ?
विरक्ति-भूमी माझी खोदुनि
मधुर प्रीति-जल प्राशुनि बघशिल.

जायाचें तर जा जा राजा
खुल्या झऱ्याचें पाणी प्याया
जायाचें तर जा जा राजा
नदींत वाहत्या डुंबायाला.

जायाचें तर जा जा भुलुनी
गिरसप्पा धबधबा पाहुनी
कशास येथें सायासानें
विरागि भुइ मम खोदित बसशी ?

भुईंत माझ्या कितीतरी थर
खणतांना रे जाशिल दमुनी
मधेंच कासावीस होउनी
अर्ध्यावरही जाशिल परतुनि.

नवथर कंवळ्या तुझ्या प्रीतिचीं
बलशाली आयुधें घेउनी
नेटानें अति जमीन खणुनी
मत्प्रीतीजळ धुंडित वसशी.

तुझ्या निरागस नेत्रांमधुनी
तुझ्या भावड्या हृदयामधुनी
कणखर तुझिया हातांमधुनी
असंख्य – अगणित संमोहन शर.

तुझ्या मोहनास्त्रांनीं तूं रे
वैराग्याच्या भुईतुनी ह्या
आसक्तीचा झरा शोधुनी
प्रीतीची रे विहीर खणिली !

ता. २०-१-५७

## गोड मधाच्या जगांत अपुल्या

दा. क्र. ९३९५

तुझी नि माझी दुनिया राजा
शुद्ध गोडशा मधाचीच रे
चाखुनि -- डुंबुनि मधांत ह्या मी
पुन्हां मागुती फिरेन कशि रे ?

निर्मल तुझिया श्वासानें तूं
मम हृदयाच्या पोकळींत रे
मधुर निरागस दिव्य प्रीतिची
हवा पुरेपुर सोडिलीस रे.

श्वासानें तव नवजीवन मज
स्पर्शानें तव चिरयौवन मज
हास्यानें तव नवोन्मेष मज
अखंड आतां सौख्य मदिय हें.

मृदुल मुलायम शब्दांनीं तूं
फुलें उधळिशी माथीं माझ्या
हरेक पुष्पामधुनी राजा
ओघ मधाचा ठिबकत आहे.

अशा तुझ्या ह्या मधांत भिजुनी
पुरती ओलीचिंबच मी रे
स्नेहल स्पर्शाच्या मधमाशा
करितिल राखण प्रीतिमधाची.

गोड मधाच्या जगांत अपुल्या
नैराश्याच्या चिंचा कुठल्या ?
आंबट चव ती जुनी आठवुनि
अतां सुखानें हंसावयाचें.

तुझ्या निरागस शृंगारानें
फुलविल्यास तूं नसानसा मम
आणि अतां ह्या नसांतुनी रे
चैतन्याचे झरे वाहते.

चैतन्याचे – उल्हासाचे
झरे वाहते चहूंकडे रे
आणि मधोमध पहा शोभला
गोड मधाचा अमूप सांठा.

ता. २१-१-५७

# बांसरी

गोड मधाच्या सांठ्यानें मज
दिली बांसरी मधांत भिजवुनि
अलगद ठेवुनि माझ्या अधरीं
कृष्णसखा मम लपला घडिभरि.

कृष्णसखा मम लपला घडिभरि
विरहाश्रू मग माझ्या नयनीं
तोंच जादुच्या बांसरींतुनी
सूरहि अभिनव निघूं लागले.

विरहाचे सुस्कारे विरुनी
आणि उरींची काहिलि निवुनी
तृप्तीचे अन् साफल्याचे
सूर जादुचे घुमूं लागले.

नव्हतें माहित बांसरि कसली ?
किमया अद्भुत लाभलि कुठुनी ?
दिव्य अलौकिक अमृतमय स्वर
पूर्वी ना कधिं पडले श्रवणीं.

त्या सूरांनीं माझ्या नकळत
शब्दरूप हो केलें धारण
आणि अमर गीतें राधेचीं
अवतरलीं हो पुन्हां भूतलीं

माझें मजला नाहीं भानहि
माझी मजला नाहीं जाणिव
ना संवेदन सूरांचें ह्या
बांसरि केवळ माझ्या अधरीं.

गोड मधानें भिजलेली ही
बांसरि भारलि अंगुरेणूंतुनि
तेजोमय त्या कृष्णसख्याचे
बोलच अविरत निघती ह्यांतुनि.

राधा मी हो भोळिभाबडी
कृष्णसखा तो चतुर बिलंदर
बांसरि माझ्या मुखांत ठेवुनि
सूर आपुले काढी त्यांतुनि !

ता. २५-१-५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
मध... अनुक्रम ........................ घि: ........... ५५
क्रमांक ...................... नों: दि: ..............

# मधाचा चंद्र

गोड मधाच्या सांठ्यानें मज
दिली बाइ नखशिखांत भिजवुनि
सहजीं फिरतां इथुनितिथुनिही
चहूंकडे ठिबकतो पहा मध.

आजवरी किति म्हटलीं गाणीं
नानाविध रस मुदें आळवुनि
शृंगाराचीं फुलतीं कमळें
करुणरसामधिं बुडलीं कितिदां.

सुखदु:खाचीं फिरतीं वलयें
घट्ट पकडलीं ह्या हातांनीं
रोमांचांनीं थरथरली तनु
पुन्हां आसुंनीं भिजली कितिदां.

कवनाकवनांमधुनी लिहिली
दर्दभरी ही कहाणि माझी
तृप्तीचे तारे इवलाले
नैराश्याच्या तमीं झळकती !

असेंच होतें जिणें आजवरि
तसेंच पुढतीं – मना वाटलें
आणि अचानक गोड मधाचा
अमूप सांठा मला गवसला.

गोड मधाचा सांठा माझा
सखा लाडका कंवळा कंवळा
इवले तारे लोपुनि सारे
पूर्ण चंद्र मज अतां लाभला.

नैराश्याचें तम दुरि सारुनि
सौख्याचें चांदणें पसरलें
पुनव माझि रे गोड मधाची
मधांत पुरती भिजलें भिजलें.

गोड मधाचा चंद्र मिळाला
झालें आतां मधमय केवळ
गीतांगीतांमधुनी आतां
मधाचीच बरसात खरोखर !

ता. २५-१-५७

# कोकिळा

कुहू कुहू गातसे कोकिळा
आळवितें ना ती कोणाला
हर्षाचा अन् उल्हासाचा
सूर मनोहर कंठीं तिचिया.

अशीच माझी काव्यकोकिळा
गाई पंचमस्वरांत बाई
कर्णमधुर त्या गीतांतुनि हो
नवींनवीं किति गुपितें फुटलीं.

काव्यकोकिळा म्हणते आतां
चोंच माझि ही मधांत बुडली
आणि म्हणुनि मज सहाहि ऋतुंमधिं
वसंतवदनचि दिसतें बाई.

खुल्या दिलानें तार स्वरानें
गाइन दाही दिशा दणाणुनि
मधांत भिजलीं गुपितें सारीं
करीन आतां उघडीं उघडीं.

सांगिन नवथर कंवळा कंवळा
किशोर कैसा आपक झाला
आणि मधाच्या कारंजांमधिं
राधा ही कशि भिजुनी गेली.

राधेच्या त्या भालीं बाई
होती इवलाली आंठीही
लाडिक मोहक हंसुनी त्यानें
अलगद ती हो कैशी पुसली ?

राधेचे ते ओठहि बाई
मूक रुदन हो करितचि होते
लालचुटुक अधरांनीं त्यानें
कुंभ मधाचे तिथें ओतिले.

राधेच्या त्या उरांत बाई
होती धगधगती ज्वाला ग
शीतल त्याच्या श्वासानें परि
तिथें मधाचें पोळें जमलें.

राधेच्या त्या खांद्यावरती
काव्यकोकिळा हिरमुसलीशी
मंगल त्याच्या स्पर्शानें परि
नसांनसांतुनि हर्षें फुलली.

राधा होती श्रांत – म्लान ती
तिची कोकिळा तशिच बापुडी
किशोर कंवळा पाहुनि राधा
रासक्रिडेमधिं रंगुनि गेली.

गुणी कोकिळा तल्लिन होउनि
दृश्य मनोरम मनीं सांठवी
आणि हळुच मग निवांत वेळीं
गुपितें सारीं खोलुनि देई.

चतुर बोलकी सुस्वर माझी
काव्यकोकिळा मंजुळ गाई
आणि तिच्या छोट्या चोंचींतुनि
गाणीं अमुच्या प्रीतिमधाचीं !

ता. २८-१-५७

# मधाचा पूल

तुझ्या नि माझ्यामधें लाडक्या
पूल बांधिला कुणीं मधाचा ?
वाटचाल त्यावरी करुनियां
आलें कशि तुजजवळ लाडक्या ?

किशोर तूं रे कंवळा कंवळा
प्रमदा मी रे पुरी जाणती
ह्या दोहोंतिल अंतर तूं रे
सांग सांग तोडिलेंस कैसें ?

अल्लड अवखळ भाव तुझा रे
प्रशांत मी गंभीर साजणा
होतों आपण दो तीरांवर
तूंच उभारशि सेतू सुंदर.

बाहिलेंस मज कांठावरुनी
साद तुझी मीं इथें ऐकली
मध्यें वाहती नदी परंतु
सांग सांग मीं यावें कैसें ?

इवल्या तुझिया करांत होते
असंख्य अगणित कुंभ मधाचे
एकामागुनि एक सोडतां
नदिंत वाहत्या तरूं लागले.

अजब मनोहर पूल मजेचा
बांधिलास मजखातर राजा
लगबग लगबग येउनि मग मी
पहा तुला बिलगलें लाडक्या.

दरेक कुंभावरती राजा
पहा पहा कोरिलीं अक्षरें
लोभ – स्नेह – संमोह – प्रेम हे
पहिले होते कुंभ चार रे.

माया – ममता – आपुलकी हे
पहा पहा त्यापुढिल कुंभ रे
गोडिगुलाबी – जिव्हाळा मग
हस्तांदोलन सहजीं घडलें.

कुंभ मधाचे ह्याच्यानंतर
प्रणयांताचि आकंठ बुडाले
स्पर्शाच्या नानाविध तऱ्हा
नांवें त्यांचीं कुंभावरतीं.

अनेक भरले कुंभ मधाचे
सेतू असला मला लाभला
चतुराईनें चढतां त्यावरि
मीही पुन्हां कंवळी बनलें.

सखा मदिय हा कंवळा कंवळा
मधांत मज निशिदिनीं डुंबवी
पूल मधाचा सुरेख निर्मुनि
पहा पहा मज कैसा दिपवी.

अमर आमुचा पूल मधाचा
जेणें आलों दोघें जवळी
आणि प्रभावी निर्माता हा
मिठींत माझ्या पहा शोभला !

ता. २९-१-५७

# शांत मनानें घेऊं अनुभव

किशोर तूं रे कंवळा कंवळा
प्रणयभाव तव भोळा भोळा
नको पुसूं कधिं दुजा कुणाला
रूप नि रेषा ह्या प्रीतीच्या.

सरल निरागस उघडी उघडी
प्रीत रांगडी तुझी लाडक्या
पटली माझ्या मनास पुरती
पटली – पटली हृदया भिडली.

डावपेंच ह्या खेळामधले
नको जिवलगा घेऊं शिकुनी
रानफूल तें रानामधलें
अधिकच डौलानें रे डुलतें.

स्वैर मनानें वायूसंगें
बागडलें बघ फूल भाबडें
कसें फुलावें ? कसें खुलावें ?
सांगे का कधिं कुणीं तयाला ?

तसेंच राजा तुझ्या प्रीतिचें
फूलहि फुलतें मम श्वासानें
स्पंदन माझ्या हृदयींचें रे
तुझ्या प्रीतिच्या फुला जगवितें.

सखा मदिय हा कंवळा कंवळा
मधांत मज निशिदिनीं डुंबवी
पूल मधाचा सुरेख निर्मुनि
पहा पहा मज कैसा दिपवी.

अमर आमुचा पूल मधाचा
जेणें आलों दोघें जवळी
आणि प्रभावी निर्माता हा
भिंतीत माझ्या पहा शोभला !

ता. २९-१-५७

## शांत मनानें घेऊं अनुभव

किशोर तूं रे कंवळा कंवळा
प्रणयभाव तव भोळा भोळा
नको पुसूं कधिं दुजा कुणाला
रूप नि रेषा ह्या प्रीतीच्या.

सरल निरागस उघडी उघडी
प्रीत रांगडी तुझी लाडक्या
पटली माझ्या मनास पुरती
पटली – पटली हृदया भिडली.

डावपेंच ह्या खेळामधले
नको जिवलगा घेऊं शिकुनी
रानफूल तें रानामधलें
अधिकच डौलानें रे डुलतें.

स्वैर मनानें वायूसंगें
बागडलें बघ फूल भाबडें
कसें फुलावें ? कसें खुलावें ?
सांगे का कधिं कुणीं तयाला ?

तसेंच राजा तुझ्या प्रीतिचें
फूलहि फुलतें मम श्वासानें
स्पंदन माझ्या हृदयींचें रे
तुझ्या प्रीतिच्या फुला जगवितें.

तुझ्या प्रीतिच्या फुलांत राजा
गोड मधाचा अमूप सांठा
तृषार्त माझ्या अधरांनीं मी
अविरत तो रे चोखित बसतें.

नको पुसूं तूं दुजा कुणाला
रूपरंग प्रेमाचा कधिंही
तुलाच पुसतां सांग झडकरीं
प्रीती असते मधमय केवळ.

कुणीं अभागी म्हणती प्रीती
पहा विषारी खड्ग दुधारी
आगच जणुं ती, सदा पेटती
सुज्ञांनीं झणिं दूर पळावें !

वच हे असले फसवे निष्ठुर
कितीकदां मी ऐकुनि शिणलें
नको लाडक्या – नको जिवलगा
श्रवणीं कधिं ते तुझ्या पडाया.

मीच एकटी सखी तुझी ना ?
पहिलीवहिली आवडती रे !
जें जें पुसण्या हवें तुला तें
मलाच पुसुनी पहा लाडक्या.

तुझ्या प्रीतिच्या मधांत भिजुनी
गोडगोड कायमची बनलें
अखंड अपुली प्रीती आतां
मधुर मधाची सदाच ती रे.

दो हृदयांचा मिलाफ सुंदर
शांत मनानें घेऊं अनुभव
भडक रंग लटक्या प्रीतीचे
तुला मला ना दिसतिल कधिंही !

ता. ३०–१–५७

# आणशील ना बळ सिंहाचें ?

चहूंकडुनि दु:खामधिं बुडतां
पंचप्राणहि झाले गोळा
तुला यावया विलंब होतां
खरेंच वाहुनि गेलें असतें.

पाहिलेंस तूं कुठुनितरी मज
लगबग धांवुनि येशी जवळी
वल्हवुनि आणिशि नाव सुखाची
सवेंच मजही घेऊनि जाशी.

तृप्तीच्या कांठावरि आलों :
सौख्याच्या नावेंत बैसुनी
तुझ्या बाहुच्या आधारावरि
शांत मनानें विसावलें मी.

तुझ्या थोर हृदयावरि राजा
मला लाभला गोड आसरा
प्रीतीची मज ऊब देउनी
तूंच हवें घरकुल निर्माया.

तूंच हवें मज फुलवायाला
तूंच हवें मज जगवायाला
तूंच हवें मज सुखवायाला
तूंच हवें मज हंसवायाला.

बांध बांध मजभंवतिं कोट रे
नको पूर्विचें दुःख दिसाया
अगणित लोभस नव्या सुखांनीं
टाक मला रे पुरती वेढुनि.

सुरा दिव्य तुझिया प्रीतीची
पाज पाज मज पुन्हां पुन्हां
पुरेपूर रे कैफ चढूं दे
नको स्मराया जुनें दुःख तें.

कंवळ्या तुझिया हातांना हे
पेलतील ना भारहि सगळे ?
सांग लाडक्या – सांग जिवलगा
आणशील ना बळ सिंहाचें ?

ता. ३१-१-५७

# महति शुद्धतम चारित्र्याची

किशोर तूं रे कंवळा कंवळा
मलाच कां बिलगशि लडिवाळा
विरुदें कितितरि लटकाविशि तूं
पहा पहा छातीवरि माझ्या.

विरुदें माझ्या पावित्र्याचीं
बिरुदें माझ्या निर्मलतेचीं
बिरुदें माझ्या उज्ज्वलतेचीं
तुझ्याच करवीं मला लाभलीं.

तुझा निरागस मुखडा सुंदर
सुवर्णपदकचि मम शुचितेचें
अनुपम तुझिया लावण्याची
थैली मानाचें धन माझें.

स्नेहल प्रेमळ हातांनीं तूं
मुठींत कोंबशि माणिकमोतीं
अगणित तुझिया स्पर्शांनीं रे
पहा तिजोरी माझी भरली.

ऊबदार मउ तळहातांनीं
परस्परां किति गुपितें कथिलीं
तुझ्या धिटुकल्या बोटांनीं किति
बिनतारी संदेश धाडिले.

तुझ्या उमलत्या तारुण्याचा
नवा नवा उन्मेष मनोहर
उधळुनि माझ्या अंगावरि तूं
दिलीस मज बहुमोल शाल रे.

शाल तुझी ही सन्मानाची
प्रशस्तीच मम पावित्र्याची
लपेटुनी ती अंगाभंवतीं
धन्य धन्य मी धन्य जाहलें.

उत्कट तुझिया शृंगाराचीं
बिरुदें माझ्या छातीवरती
पहा सांगती डौलाने तीं
महति शुद्धतम चारित्र्याची.

ता. ३१-१-५७

# पुण्यच मम साकार जाहलें !

विरक्ति हिवाळ्यामधिं गोठुनि
बनला ह्या हृदयाचा हिमगिरि
प्रखर प्रीतिकिरणांनीं परि तव
पहा पहा वितळतो कसा हा.

प्रचंड हिमगिरि वितळे हलुहलु
सुंदर सरिता उगम पावती
तशाच माझ्या हृदयांतुनिही
अमर प्रीतिच्या नद्या उदेल्या.

तुझ्या निरागस वदनाभवतीं
तेजोमंडल रे लडिवाळा
त्या तेजाची आंच लागुनी
विरक्तिचा हिमगिरि विरघळला.

तुझ्या प्रीतिच्या ऊबेमध्यें
बर्फहि माझें जलमय बघ रे
ह्याच जलांतुनि पहा वाहतिल
मधु प्रणयाच्या सरिता सुंदर.

मधु प्रणयाच्या सरिता सुंदर
आसमंत समृद्ध बनविती
तुझ्या नि माझ्या जीवनांत रे
सुबत्ताच ह्यापुढें सदाची.

ह्या सरितांच्या कांठावरती
पावन तीर्थक्षेत्रें वसतिल
गंगोदक तें प्राशुनि, चाखुनि
कितिक मुक्त पापांतुनि होतिल.

तुझी नि माझी प्रीत राजसा
शुद्ध निरागस रे लडिवाळा
मुग्ध मनोहर मिलाफ अपुला
बघणाऱ्यांना पुण्यच लाधे.

तुझ्या रुपानें सुकुमारा रे
पुण्यच मम साकार जाहलें
घे घे मजला घट्ट लपेटुनि
वितळूं दे मज तुझ्या मिठीनें !

ता. ३१-१-५७

# घरटें

होत्या माझ्या पुढ्यांत राजा
वैराग्याच्या तृणराशी रे
संयमतापामध्यें पोळुनी
शृंगाराची हिरवळ सुकली.

आणि राजसा लडिवाळा रे
चिमणी अपुली चोंच घेउनी
येशी माझ्या पुढ्यांत तूं रे
तृणराशी ह्या चिवडित बसशी.

काडी काडी निवडुनि घेउनि
बांधिलेंस रे घरटें सुंदर
ऊब तुझ्या प्रीतीची त्यामधिं
वाहाशि मज तूं लाडें लाडें.

इवल्या चिमण्या चोंचीनें रे
धरुनि चिकाटी उभारशी घर
सानुकल्या त्या घरट्यामध्यें
गोड निवारा माझ्यासाठीं.

माझ्या चिमण्या रे सुकुमारा
चिमणीपरि मी होइन सखि तुझि
आणि तुझ्या घरट्यामधिं राहुनि
निशिदिनिं तुज मी खरेंच सुखविन.

चिमणा तूं रे चिमणी मीही
चोंचीमध्यें चोंच घालुनी
चिंव चिंव करुनी सांगूं जगता
पहा पहा हें घरटें सुंदर.

वैराग्याच्या तृणकाड्यांतुनि
अविरत खपुनी ह्या चिमण्यानें
उभारुनी ममतेचें घरकुल
सखिस आपुल्या तोषविलें हो.

इवल्याशा त्या घरट्यामध्यें
तृप्तीच्या हो गाद्यागिरद्या
तृणशय्या सोडुनी सखी ती
इथें सुखानें पहूडली हो !

ता. १–२–५७

# अभुक्त

शुद्ध शील मम सिद्ध कराया
नको पुरावा दुसरा कुठला
तुजसम कंवळा युवक भाळला
हीच निशाणी होय पुरेशी.

भडक सुगंधी फुलें सोडुनी
कृष्णमुरारी तुळसच निवडी
म्हणुनि आजला घरोघरीं तिज
सुवासिनी त्या पूजित बसती.

तशीच मी रे साधीभोळी
सद्‌गुण माझे तुळस मंजरी
मुरलीधर तूं मलाच वरुनी
गौरविलें मम रूप गंध रे.

सद्‌गुणगौरव करण्याखातर
अवतरतो भूवरि परमेश्वर
तशीच मी बहुगुणी नार रे
प्रकटलास तूं ईशच केवळ !

दिव्यत्वाची प्रचिती येण्या
हवा ईश्वरी अंशहि जवळीं
तुझें 'देव'पण आकळलें मज
हीच साक्ष मम पावित्र्याची.

तुझ्या निरागस वदनाभवतीं
अद्भुत तेजोमंडल सुंदर
नसांनसांतुनि तुझिया राजा
सत्प्रीतीची वाहति गंगा.

पुण्यवंत हा हात तुझा रे
गुंफिलास तूं माझ्या हातीं
हीच मनोरम खूण पहा रे
निर्मल माझ्या चारित्र्याची.

तुझ्या उमलत्या तारुण्याचा
नवथर कंवळा गोड फुलोरा
उधळुनि माझ्या अंगावरती
कवळिलीस तूं अभुक्त प्रीती !

ता. २-२-५७

# उणावेल का मयुरतेज तें ?

लोभस मोहक प्रीतिमयूरा
भुलवाया लांडोर-लालसा
चाटित जिभल्या – लचकत-मुरडत
पुढें पुढें येउनी पातली.

प्रीतिमयूरहि मनीं हरखला
भव्य पिसारा झणीं फुलविला
डौलानें तो डुलवित डुलवित
नृत्य मनोरम करूं लागला.

कधीं न कळलें त्या वेड्याला
अनुपम अपुली रूपसंपदा
इवल्या एका पिसाचीहि त्या
लांडोरिस ना यायाची सर.

दिलखेचक ते रंग मनोहर
नृत्य मनोवेधक तें सुंदर
पाहुनि देवी सरस्वतीहि
स्थान देइ त्या अपुल्याजवळी.

मयूरपंखांवरचे डोळे
पहा झळकती किति तेजानें
तशीच अपुली प्रीतहि राजा
भाव उदात्तहि तिचे तळपती.

उत्कट दैवी प्रीतीचा हा
अमर चिरंतन मयुरपिसारा
पहा फुलविला कसा लीलया
क्षुद्र लालसा-लांडोरीनें.

अशीच असते विधीयोजना
तशिच पुढें ती चालायाची
लांडोरीला नृत्य दावितां
उणावेल का मयुरतेज तें ?

भोगलालसाप्रेरित ऐसें
नृत्य अलौकिक प्रीतीचें हें
पाहुनि तोषलि सौख्यशारदा
जवळ बाळगी प्रीति-मयूरा.

ता. ३-२-५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलक्रम,
अनुक्रम 22994 वि: ३/०५
क्रमांक 9326 नों: दि: 37/4/५०

# त्या कलिकेची निष्ठा राजा !

प्रभातकाळीं मंगल समयीं
तोषद कोमल रविकिरणांनीं
पहा उमलली गुलाबकलिका
प्रसन्नशी टवटवीत होउनि.

तोच भानु मग ऐन दुपारीं
प्रखर आपुल्या डोळ्यांनीं तिज
पहापहा भाजुनी काढितो
कोमलांग तें म्लान बनवितो.

ज्या हातांनी हलकें हलकें
पाकळिपाकळि तिची फुलविली
तेच हात अधिकारानें अजि
नाजुक देहा तिच्या सुकविती.

साधीभोळी गुलाबकलिका
हंसे बिचारी सुकतांनाही
म्हणे फुलवि जो – तोच सुकवितो
परम भाग्य हें माझें बाई !

त्या कलिकेची निष्ठा राजा
पहा पहा तूं माझ्या ठायीं
फुलविलेंस तूं हलकेंहलकें
सुकवितांहि ना रुसावयाची.

तोषद कोमल प्रणयानें तूं
पाकळिपाकळि माझि फुलविली
प्रसन्नशी टवटवीत होउनि
पहा पहा मी कशी उमललें.

आणि उद्यां तूं ऐन दुपारीं
प्रपंचतापामध्यें पोळुनि
अधिकारानें देशिल चटके
तरीहि मी रे हंसतचि राहिन.

हात कोंवळे तुझे आजचे
राठ उद्यांला बनावयाचे
स्पर्श तुझा तेव्हांही मजला
खरेंच राजा – खरेंच सुखविल !

ता. ३–२–५७

# बंद लिफाफा

पहिलेंवहिलें गोड गुलाबी
प्रणयपत्र रे तुझें वाचण्या
अधीर झाले भोळे डोळे
आतुर उत्सुक अंतर कधिंचें.

तोंच अचानक पुढें ठाकशी
नाजुक इवले ओठ मुरडुनी
सुंदर भावाकुल मुद्रा ती
बनविशि कोरी दीर्घ प्रयत्नें.

प्रशांत मोहक वदन तुझें तें
जणूं लिफाफा बंद गुलाबी
अधरीं तुझिया पत्ता माझा
प्रेमपत्र रे आंत मनामधिं.

थांब लाडक्या – रे लडिवाळा
रे आवडत्या गोड लिफाफ्या
अधरांनीं ह्या खोलूं दे मज
प्रेमपत्र रे तुझें गुलाबी.

मदनतुल्य सुंदर देहाचा
बंद लिफाफा लंबाचौडा
सांग लाडक्या – खोलूं कुठुनी ?
प्रेमपत्र तें उघडूं कुठुनी ?

गोड मधानें भिजलेलें तें
प्रेमपत्र तव पहिलेंवहिलें
वाचण्यास हे सहस्र डोळे
पहा माझिया रोमांचांचे.

मिठींत माझ्या बंद लिफाफा
गोड गुलाबी – हलता हंसरा
अधरांनीं मीं हळुच उघडितां
पानें मोकळिं आंतिल सारीं.

त्या पानांमधिं स्पष्ट वाचला
कबुलीजबाब तुझ्या प्रीतिचा
प्रेमपत्र मधु लिहिण्याखातर
देहच अपुला करिशी सादर.

ता. ६–२–५७

# वरदक्षिणा

घे घे मोजुनि घे सुकुमारा
शंभर अस्सल सुवर्ण होनचि
दरेक होनावरी पहा ना
छाप तुझ्या मोहक मुखड्याचा.

तुझ्या प्रीतिच्या मधांत बुडुनी
ना झाले षण्मासहि अजुनी
तोंच पहा मीं कशा निर्मिल्या
लखलखणाऱ्या छान मोहरा.

मिटल्या माझ्या मुठींत राजा
लख मोहरा कोऱ्या कोऱ्या
तुझ्या मुखाचा छाप मारुनी
तुलाच त्या रे अर्पायाच्या.

प्रीत आपुली – सोनें अस्सल
कविता माझी बंदी मोहर
शिक्का त्यावरि तुझाच राजा
तूंच धनी ह्या साम्राज्याचा.

घे घे राजा घे वाजवुनी
मोहर माझी अस्सल अस्सल
तारिख ह्यावरि जरी आजची
युगेंयुगें ती चालायाची.

दागदागिने सोन्याचे ते
मूढ अज्ञ वनिताहि घालिती
परंतु मोहर घडवुनि देण्या
हात हवे राजाचे केवळ.

बळशाली रे हात मदिय हे
सम्राटचि तूं सत्ताधारी
तुझी नाममुद्रा छापुनि मी
पहा घडवितें किती मोहरा.

ह्या होनांची तुळा राजसा
सुंदर वरदक्षिणा पहा रे
अतुल आपुलें वैभव पाहुनि
कुबेरही मनिं शरमिंदा रे.

ता. ६–२–५७

# आण

जें जें मंगल – जें जें उज्ज्वल
जें जें निर्मल – पवित्र जें जें
त्या सर्वांची आण घेउनी
म्हणतें तुजविण ना प्रिय कोणीं.

देव्हाऱ्यांतिल देवमूर्तिपरि
झळके शुचिता तुझिया वदनीं
मत्प्रीतीची उदबत्ती मी
पहा पहा तुजपुढें जाळितें.

मंद मधुर गंधानें अपुल्या
आसमंत ती टाकी भारुनि
तशीच राजा मीही तुजला
गोड गुणांनीं देइन सुखवुनि.

जपतप करिती साधुसंत ते
आत्मोन्नति साधुनि घ्याया रे
नामस्मरणें तुझ्या मला परि
खरेंच उन्नत पुरें बनविलें.

निराकार तो परमेश्वर रे
भक्तिभावनेमधेंच वसतो
संतांच्या भोळ्या हृदयांमधिं
अंश ईश्वरी सहज प्रकटतो.

अत्युत्कट भावांतच राजा
निवास बलशाली ईशाचा
मत्प्रीतीच्या उदात्त क्षेत्रीं
दिव्य असें देऊळ उदेलें.

तेजोमय त्या मंदिरांत रे
तुझीच मूर्ती रे सुकुमारा
नित्य पूजितें शुद्ध मनानें
तुझ्याचमध्यें देव पाहतें.

जें जें मंगल – जें जें उज्ज्वल
जें जें निर्मल – पवित्र जें जें
त्या सर्वांची आण घेउनी
म्हणतें तुजविण ना प्रिय कोणी !

ता. ७–२–५७

# अनुपम जोडी

जीवननौका तुझी लाडक्या
होती विहरत शांत सुखानें
मातेच्या मधु ममतेच्या रे
संथ – संथशा नदीप्रवाहीं.

मींच ओढिलें तुला तेथुनी
आणि आग्रहें दिलें लोटुनी
मत्प्रीतीच्या अफाट सागरिं
खळबळणाऱ्या लाटांमध्यें.

अजाण तूं रे किशोर कंवळा
जीव तुझा रे होइ घाबरा
कर्णधार मी चतुर कुशल रे
विसंबुनी तूं रहा मजवरी.

रुद्र भव्य ह्या दर्यामध्यें
जीवननौका तुझी डोलत
लाटांवरि ती जरि हिंदळते
सहज सांवरुनि धरीन मी रे.

कधीं कधीं तूं त्रस्त होउनी
म्हणशि सोड मज नदीप्रवाहीं
दर्याचें जल मादक चाखुनि
पुन्हां संथ जलिं रमशिल कुठवरि ?

हात कोंवळे शैशवांतले
कामिनिकंठीं पडति यौवनीं
तिथेंच ते रे विसावयाचे
मागुति ना कधिं वळावयाचे.

संथ नदीच्या प्रवाहास रे
वानावें तूं दूरच राहुनि
सोडिन जर मी पुन्हां तिथें तुज
झुरशिल तूं ह्या दर्याखातर.

हात तुझा मम करीं गुंफतां
शैशव भोळें तुझें हरपलें
गेलें निसटुनि तें वेगानें
नको श्रमूं पकडाया पुन्हां.

अथांग प्रीतीसागरांतला
धुंद धुंद हा वारा पिउनी
लाटांच्या तांडव-नृत्यामधिं
जाऊं तूं मी दोघें रंगुनि.

जीवननौका तुझी मनोहर
नावाडी मी गुणी खरोखर
ऐशी अनुपम जोडी जमतां
ना भय आम्हां कलिकाळाचें !

ता. ८-२-५७

# अनुपम जोडी

जीवननौका तुझी लाडक्या
होती विहरत शांत सुखानें
मातेच्या मधु ममतेच्या रे
संथ - संथशा नदीप्रवाहीं.

मींच ओढिलें तुला तेथुनी
आणि आग्रहें दिलें लोटुनी
मत्प्रीतीच्या अफाट सागरिं
खळबळणाऱ्या लाटांमध्यें.

अजाण तूं रे किशोर कंवळा
जीव तुझा रे होइ घाबरा
कर्णधार मी चतुर कुशल रे
विसंबुनी तूं रहा मजवरी.

रुद्र भव्य ह्या दर्यामध्यें
जीवननौका तुझी डोलतं
लाटांवरि ती जरि हिंदळते
सहज सांवरुनि धरीन मी रे.

कधीं कधीं तूं त्रस्त होउनी
म्हणशि सोड मज नदीप्रवाहीं
दर्याचें जल मादक चाखुनि
पुन्हां संथ जलिं रमशिल कुठवरि ?

हात कोंवळे शैशवांतले
कामिनिकंठीं पडति यौवनीं
तिथेंच ते रे विसावयाचे
मागुति ना कधिं वळावयाचे.

संथ नदीच्या प्रवाहास रे
वानावें तूं दूरच राहुनि
सोडिन जर मी पुन्हां तिथें तुज
झुरशिल तूं ह्या दर्याखातर.

हात तुझा मम करीं गुंफतां
शैशव भोळें तुझें हरपलें
गेलें निसटुनि तें वेगानें
नको श्रमूं पकडाया पुन्हां.

अथांग प्रीतीसागरांतला
धुंद धुंद हा वारा पिउनी
लाटांच्या तांडव-नृत्यामधिं
जाऊं तूं मी दोघें रंगुनि.

जीवननौका तुझी मनोहर
नावाडी मी गुणी खरोखर
ऐशी अनुपम जोडी जमतां
ना भय आम्हां कलिकाळाचें !

ता. ८-२-५७

# अमोल कंठा

मत्प्रीतीचा वज्रहार रे
घेतलास तूं झडप घालुनी
मींहि खुषीनें तुला राजसा
अमोल कंठा बहाल केला.

दिपशी घडिभर त्या तेजानें
लगेच परि मग होशी सावध
म्हणशि हात हे कंवळे माझे
किंमती हारा जपतिल कैसे ?

कांति पाहुनी गेलों भुलुनी
कुवत किती मम गेलों विसरुनि
पहिल्यावहिल्या आवेगामधिं
वज्रहार मीं उरीं कवळिला.

जातों आतां जातों परतुनि
वज्रहार हा इथेंच टाकुनि
नको लाडके अडवूं मजला
काम कठिण ना जमावयाचें.

हंसलें गालीं मीही मग रे
म्हटलें – जा जा खुशाल राजा
तेज अलौकिक स्मरुनी तूं हें
होशिल सुखशय्येस पारखा.

मूल्यवान हा वज्रहार तूं
सुखासुखीं सोडितां हातचा
दिनरातीं बेचैन होउनी
खरेंच राजा येशिल परतुनि.

हाराच्या जपणूकीहूनहि
रत्नविरह तुज असह्य होइल
कवळुनि तेजा पुन्हां सोडणें
सख्या जिवलगा – नाहीं सोपें.

जातांही तूं फिरशिल मागुति
नकोच ना तें जाणें दुरि रे
तुझ्या निरागस हृदयावरि हा
वज्रहार बघ कसा शोभला !

ता. ८–२–५७

# समृद्ध ओंजळ

अजाण तूं रे किशोर कंवळा
तृषा प्रीतिची ना तुज माहित
कधींपासुनी तृषार्त मी परि
तगमग ही तुज कशी कळावी ?

तूं मी मिळुनी हात जुळवितां
प्रीतिजलानें ओंजळ भरली
तृषार्त माझ्या अधरांनी मीं
तुझ्यासवें जलपानहि केलें.

तुझ्या निरागस भोळ्या हृदया
नव्हती माहित तृषा प्रीतिची
तृषाच नाहीं – म्हणुनी तृप्ती
निमिषार्धामधिं तुला लाभली.

घट्ट गुंफलेले कर अपुले
नकळत करिशी सैल जरा तूं
प्रीतिजलाची ओंजळ मग ही
पहा पहा तिज लागे गळती.

जाग जाग रे जाग राजसा
नसे जरी जाणीव आज तुज
ओठ कोंवळे तुझे लाडक्या
हां हां म्हणतां तृषार्त बनतिल.

तृप्तीचें तव संवेदन जरि
कोमल बोंथट असे आजला
नकळत होइल धार तीक्ष्ण ती
आणि गळां लागेल तांत मग.

हो सावध वेळींच राजसा
घट्ट घट्ट कर पकड तुझी ती
प्रीतिजलाची भरली ओंजळ
नको नको झिरपूं देऊं तिज.

प्रीतिजलाची ओंजळ सुंदर
तुझे नि माझे अधर तयामधिं
अखंड प्राशन करितांही ती
समृद्धचि रे पहा सदाची !

ता. ८-२-५७

# षोडषवर्षी युवक कोंवळा

षोडषवर्षी युवक कोंवळा
चंद्रकळा सोळाहि विकसल्या
पूर्णगोल तेजोमय सुंदर
ह्याच वयामधिं तुम्हीं पहावा.

षोडषवर्षी ज्ञानेशांनीं
पवित्र ज्ञानेश्वरी निर्मिली
षोडषवर्षी शिवरायांनीं
कोंडाणा जिंकला लीलया.

षोडषवर्षी युवक कोंवळा
नका मानुं त्या अजाण भोळा
प्रज्ञेचें पूर्णत्व मनोहर
सोळाव्या वर्षीच प्रकटतें.

नवोन्मेष फुलत्या ज्वानीचा
नसांनसांतुनि ओसंडावा
आणि त्यांतुनी सहजासहजीं
उत्पत्ती नूतन तेजाची.

षोडषवर्षी नवयुवकाची
प्रभा नेत्रदीपक ही ऐशी
पाहुनि ज्ञानी पंडितही कधिं
स्तंभित – विस्मित होउनि जाती.

अवतारी दैवी पुरुषांचीं
दिव्य अलौकिक कर्तृत्वें तीं
गाजति कोमल वयामधेंही
रामकृष्ण ते हेंच सांगती.

षोडषवर्षी युवक कोंवळा
मोहक वेधक पूर्णेंदूपरि
क्रमाक्रमानें वाढत जाउनि
लोभस गोलाकारी बनला.

असा पूर्ण तेजोगोलचि मज
तुझ्यामध्यें रे दिसतो राजा
मुठींत मीं तो घट्ट पकडितां
घडतिल विक्रम तुझ्या हातुनी !

ता. ९-२-५७

# अष्टपैलु

तुझ्या कोंवळ्या हृदयाचे मीं
अष्टपैलु पाहिले मनोहर
दरेक पैलूमधुनि राजसा
इप्सित माझें मला गवसलें.

तुझें शब्दलाघव पाहुनि रे
वाणी माझी मधुतर बनली
तुझ्या प्रीतिचें वैभव भोगुनि
सुखासीन मम वृत्ती झाली.

तुझें बुद्धिचापल्य पाहुनी
तल्लख माझी बुद्धी बनली
भावोत्कट तव हृदयानें मज
प्रणयाचा आवेग शिकविला.

तुझ्या नव्या चैतन्यामधिं मज
कितीक स्फूर्तीस्थानें दिसलीं
तुझ्या उसळत्या उल्हासानें
प्रफुल्लित हें मानस माझें.

तुझ्या विलासी शृंगारानें
नवरस माधुरि मला दाविली
तुझ्या निरागस हास्यानें रे
मीहि सुहासिनि बनुनी गेलें.

तुझ्या कोंवळ्या हृदयाचे हे
अष्टपैलु पाहुनी मनोहर
भोळ्या माझ्या हृदयालाही
पहा पहा किति पैलू पडले !

ता. १०–२–५७

# फुलदाणी

तुझें कोंवळें व्यक्तिमत्व रे
शोभे बघ चौसष्ट कलांनीं
कोमल देहीं कशा मावल्या ?
चौदा विद्या नानाविध त्या.

तुझ्या विकसत्या जीवनपुष्पा
फुलदाणी मत्प्रीतीची रे
पहा पहा ती नीट पारखुनि
शंभरनंबरी सोन्याची रे.

सुवर्णपात्रामध्यें भरलें
अमर चिरंतन प्रणयोदक रे
देठ तुझा त्यामध्यें जोंवरी
पुष्प म्लान ना कधिं व्हायाचें.

मातेच्या मधु ममतेच्या रे
गोड डहाळीवरि डुलणाऱ्या
तुझ्या मनोहर जीवनपुष्पा
मींच बळें घेतलें तोडुनी.

कुरकुरशी तूं क्षणभर सखया
लगेच परि मग जाशी मोहुनि
फुलदाणी मत्प्रीतीची ही
सुरेख नक्षीदार पाहुनी.

जननीच्या हिरव्या फांदीवरि
कटु जगताचें ऊन लागुनी
कोमल नाजुक तुझ्या पाकळ्या
कोमेजुनि रे गेल्या असत्या.

परंतु राजा मत्प्रीतीच्या
फुलदाणीमधिं अमर अमर तूं
प्रणयोदकिं तव देंठ भिजवुनी
प्रफुल्ल ताजातवानाच तूं.

प्रफुल्ल ताजातवानाच तूं
अखंड तरणाबांडच तूं रे
अशा तुला मी सोडुनि राजा
कुठेंहि ना कधिं जायाची रे !

ता. १०-२-५७

# पूर्ति

तुझ्या नेणत्या प्रीतीचे रे
भडक रंग साधेभोळे ते
थांब लाडक्या झांकूं दे मज
सौम्य जाणत्या मत्प्रीतीनें.

मंद गुलाबी प्रीती माझी
प्रीत तुझी भाबडी लाल रे
ह्या दोहोंचा मिलाफ होतां
मोहक वेधक रंग नवा रे.

नवथर कंवळ्या हातांनीं तूं
मधु प्रणयाचें चित्र रेखिलें
थांब – माझिया हातांनीं मी
उठाव सुंदर तयास देतें.

हात तुझा नवशिका लाडक्या
भरभर उत्कट रंग ओतिशी
थांब सफाईदार कुंचला
जरा मला त्यावरी फिरवुं दे.

तुझ्या नि माझ्या प्रेमाचें हें
अतुल मनोरम चित्र लाडक्या
तूंच रेखिलें – रंगविलेंही
पूर्ती केवळ माझ्या हातुनि.

मृदुता तुझिया हृदयींची रे
चित्रांमधिं ह्या सजीव झाली
आणि भावना – तरंग अपुले
ठायीं ठायीं इथें उमटले.

अप्रतिम निर्दोष कलाकृति
सुकुमारा तूं कशी निर्मिली ?
इवल्या कोमल हाताला ह्या
अपार श्रम रे कसे झेपती ?

तुझ्या नेणत्या प्रीतींतुनि रे
सहज उदेलें रम्य चित्र हें
तुझ्या नि माझ्या दोघांच्याही
हातांचे त्यावरी ठसे रे.

ता. १०–२–५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 22996 वि: काव्य
क्रमांक 9326 नों: दि: 27/8/58

# तेजोस्फुल्लिंग

तूं मीं राजा हात गुंफिले
ह्या हृदया तें हृदयहि भिडलें
दोघांच्या जुळत्या ठोक्यांचा
ताल माझिया कवनांना रे.

तुझे नि माझे समरसलेले
श्वास लाडक्या ऊन ऊन ते
नकळत शब्दाकारचि बनुनी
पहा माझिया अधरिं उमटले.

उज्ज्वल – मंगल – पवित्र – निर्मल
धीरोदात्तचि प्रीत-भावना
तुझ्या निरागस नयनिं प्रकटली
आणि माझिया हृदयिं खेळली.

मनोज्ञ क्रीडा तुझ्या प्रीतिची
विलास नवथर मधु प्रणयाचा
खोल खोल अंतरीं बिंबुनी
नकळत धारण करी शब्दरुप.

तुझ्या प्रीतिचें लाघव राजा
ह्या कवनांचें वैभव बनलें
प्रणयाकुल उच्छ्वास तुझे रे
प्राणच माझ्या मधु कवनांचा.

तुझ्या प्रीतिची अफाट दौलत
भोगुनि तृप्ती – नर्तन करि मन
पदन्यास तो मंजुळ मोहक
पहा माझिया कवनीं राजा.

प्रसन्न वदनाभवतिं तुझ्या रे
अद्भुत फिरतें तेजोमंडल
उडणारे स्फुल्लिंग तळपते,
मुठींत धरतें चपळाईनें.

त्या तेजोस्फुलिंगांतुनि रे
निर्मिति माझ्या मधु कवनांची
भव्य तुझ्या तेजोगोलांतिल
केवळ इवलाले कण ह्यामधिं !

ता. १०-२-५७.

# सुखशय्या

तुझ्या कोंवळ्या व्यक्तित्वाचा
कापुस मउमउ माझ्या हातीं
प्रीतीची धनुकली घेउनी
पहा पहा मी पिंजित बसतें.

कापुस नुसता माझ्या हातीं
बनविन त्याचें रुचेल जें जें
तुझें नि माझें हृदय जोडितां
छान मखमली पिशवी बनली.

अशा मखमली पिशवीमध्यें
कापुस मउमउ तव प्रणयाचा
निष्ठेच्या टांक्यांनीं शिवली
उशी आपुल्या शय्येसाठीं.

तुझ्या नि माझ्या दो देहांमधिं
अमर दिव्य प्रेमाचा कापुस
रेशिमधागे शृंगाराचे
दो देहांना टाकिति जुळवुनि.

तुझ्या नि माझ्यासाठीं राजा
कोमल मउमउ अशि सुखशय्या
तिथें विसावुनि जाऊं विसरुनि
शीणताप रे दिवसभराचा.

तुझें कोंवळें व्यक्तित्वचि रे
शुभ्र मऊ कापूस जणूं तो
आणिक माझें व्यक्तित्वचि रे
मृदुल मृदुल रेशिमतंतू जणुं.

ह्या रेशिमतंतूंचें विणुंया
वस्त्र आपणां पांघरण्यास्तव
अशा आपुल्या सुखशय्येचा
नृपाधिराजहि करितिल हेवा.

तुझ्या कोंवळ्या व्यक्तित्वाचा
कापुस वाऱ्यावरी सोडितां
चौफेरचि तो जाइल उडुनी
म्हणुनि ठेवितें घट्ट पकडुनी.

ता. ११-२-५७

# मऊ भुई

तुझें कोंवळें अंतर राजा
मऊ भुई भुसभुशीत जणुं ती
सहजासहजीं रुजेल त्यामधिं
जें जें मी रे पेरिन तें तें.

कोमल – स्नेहल – मृदुल – मधुरसें
साधें भोळें हृदय पाहुनी
बीजें माझ्या मधु प्रणयाचीं
दिलीं सख्या मीं त्यांत उधळुनी.

हां हां म्हणतां समृद्धचि हीं
हिरवीं प्रीतीरोपें अपुलीं
थांब तया कुंपण घालूंया
दृढ आपुल्या निष्ठेचें रे.

भुई तुझी भुसभुशीत राजा
बीजें नानाविध करिं माझ्या
एकामागुनि एक अशीं रे
पिकें कितीतरि काढूं आतां.

मोसम प्रेमाचा ओसरतां
ध्येयाचीं नूतन बीजें मी
देइन पेरुनि सख्या जिवलगा
तुझ्या कोंवळ्या हृदयामध्यें.

हां हां म्हणतां तेजोरोपें
जाउनि भिडतिल गगनाला रे
दिव्य प्रभा ती बघतां राजा
धन्य धन्य मी होइन मनिं रे.

सारे सद्गुण – कलाहि साऱ्या
जोपासिन मी तुझ्या अंतरीं
विकास सर्वांगीण पाहुनी
दिपेल दुनिया सख्या लाडक्या.

दिपेल अवघी दुनिया राजा
मोहक तुझिया व्यक्तित्वानें
कोणींही ना स्मरेल तेव्हां
मुळांत बीजें मींच पेरिलीं.

ता. ११–२–५७

# मानाचें पान

एकुलता तूं एकच सखया
स्नेही जीवाभावाचा रे
तूंच एकटा खराखुरासा
मैतर माझ्या हृदयाचा रे.

अजातशत्रू असुनीही मी
विश्वबंधुता ना मज पटली
तुझ्यावांचुनी एकाकिनि मी
मित्रहि ना कुणि – नाहीं रिपुही.

मैत्रीची रे साद घालण्या
समबल – समगुणि हवें हृदय रे
वैराचें रणशिंग फुंकण्या
शत्रूही समतोल हवा रे.

तुजविण कोणीं नाही दुसरा
समानगुणि मज अजुनि भेटला
अजातशत्रू आपण दोघें
पहा तुल्यबल नाहिंच कोणीं.

मैत्रीचा हा हात मदिय रे
पानच सोनेरी मानाचें
वैराचा फटकाराही बघ
शिरोधार्य खचितचि होइल रे.

वैराचा फटकारा माझा
प्रशस्तिपत्रक तुल्यबलाचें
तेवढेंहि परि भाग्य कुणाला
नाहीं नाहीं अजुनि लाभलें.

आणि जिवलगा – सुकुमारा रे
तुझ्या कोंवळ्या हृदयामध्यें
जाणवली मज बलाढ्यता ती
जिनें दिपवुनी मला टाकिलें.

तुझ्या कोंवळ्या देहीं वसली
गुणाढ्यता जी दुर्मिळ जगतीं
बलशाली गुणि स्नेही तुजसम
साफल्यचि रे ह्या जीवाचें !

ता. १२–२–५७

# प्रपंचगड

उंच तुझ्या त्या व्यक्तित्वाला
हवा सख्या रे टेकू बळकट
मत्प्रीतीच्या आधाराविण
भुईलगत तें होइल अवचित.

तुझ्या सुगंधी प्रणयाला रे
कुपी माझिया हृदयाची बघ
घट्ट घट्ट लावूं दे झांकण
ना तरि जाइल सुवास उडुनी.

शृंगाराची आरति मम करिं
धूप आण रे पराक्रमाचा
मंगल – उज्ज्वल धूपारतिनें
पहा पहा दशदिशा उजळल्या.

तीर अचुक तव कर्तृत्वाचा
भिडेल सहजीं यशोमंडला
हवें सख्या परि हवें त्यास रे
धनुष्य माझ्या प्रेमाचें रे.

तुझ्या मनाचें ऐश्वर्यचि रे
संपत्ती गडगंज जणूं ती
हवी तिला परि हवी तिजोरी
पोलादी मम प्रीतीची रे.

गलबत तुझिया आकांक्षांचें
मत्प्रीतीच्या शिडावांचुनी
दूर कुठेंतरि भरकटुनी तें
वळेल भलत्या दिशेलाच रे.

गजेंद्र तुझिया बुद्धीचा रे
पहा पहा डौलांत चालला
हवा तया परि हवा राजसा
अंकुश हा आसक्तीचा रे.

प्रपंचगड हा दुस्तर अवघड
चढावया त्यावरी लीलया
हवी राजसा हवीच अपणां
आसक्तीची गुणी घोरपड.

ता. १२-२-५७

# सूर्यकिरण तूं-चंद्रकला मी

सूर्यकिरण तूं – चंद्रकला मी
निर्मितीच तूं – तृप्ती मी तर
सांग सांग ह्या दोहोंमध्यें
अधिक श्रेष्ठतर सख्या कोणतें ?

तृप्तीच्या मधु सादाविण रे
वृथा निर्मिती निर्मात्याची
अहंकार व्यर्थचि सृजनाचा
तृप्तीच्या निःश्वासाविण रे.

सूर्यप्रकाशा साक्ष ठेवुनी
कार्यें उज्ज्वल कितीक प्रतिदिनिं
विसावती जन चंद्रप्रकाशीं
तृप्तीनें कृतकृत्य होउनी.

तसेंच तूंही सख्या जिवलगा
गाजव रे कर्तृत्व चहुंकडे
हंसेन मी मग कृतार्थतेनें
बरसातचि जणुं चांदण्याचि रे.

झळक झळक तूं रविकिरणांपरि
प्रकाशतें मी चंद्रकलेपरि
तुझा दिग्विजय – प्रोत्साहन मम
अशीच जोडी राहूं दे रे.

 

विक्रम जे जे सूर्यप्रकाशीं
बेत आंखले निवांत रात्रीं
आणि पूर्तिचें समाधानही
चंद्रप्रकाशामधेंच उगवे.

चांदणेंच देतसे प्रेरणा
कृतीच केवळ दिवस उजेडीं
तसेंच स्फूर्तिस्थान तुझें मी
तेजोनिर्मिति तुझ्या हातुनी.

हात तुझा मम करांत गुंफुनि
दिली तुला मीं दिली चेतना
ये ये गांठुनि यशोशिखर रे
तृप्ति तुझी झेलीन उरावरि.

ता. १४-२-५७

# ह्या मैनेची चोंच बोलकी

तुझ्या कोंवळ्या प्रीतीचा रे
अजाण पोपट डौलदारसा
वदेल मी जें शिकविन तें तें
म्हणुनि मधुर मज बोलूं दे रे.

पोपट भोळा तुझ्या प्रीतिचा
जाइल उडुनी स्वच्छंदानें
म्हणुनि राजसा मत्प्रीतीचा
पिंजराच हा सोनेरी रे.

दिनरातीं तुज खाण्यासाठीं
पक्क फळें मम प्रणयाचीं रे
आणि अखंडित प्रीतिगान रे
तुला रमविण्या – तुला हंसविण्या.

मंजुळ माझें प्रीतिगान तूं
करिशि मुखोद्‌गत निमिषार्धीं रे
लालचुटुक त्या चोंचींतुनि ते
शब्दहि अधिकच लाघवि बनले.

तांबुस इवले लाल गुलाबी
बांकदार तव अधर मनोरम
सांगति मजला प्रीती-प्रांतीं
पोपट मी ग पोपट केवळ.

तोंच नासिका गरुडापरि ती
म्हणे बुद्धिची पहा भरारी
अजाण जरि मी प्रणयरसामधिं
बुद्धी माझी गगना छेदी.

ज्ञानानें तव उजळो भुवन
रुचे मला परि पोपटपंची
रसाळ उत्कट शृंगाराची
जी मीं तुज पढविलि सायासें.

अज्ञानाचि तव प्रीतिकूजनीं
खरेंच मजला मोहवि बहुपरि
ह्या मैनेची चोंच बोलकी
तुझ्या लाल चोंचीमधिं घुसली !

ता. १४–२–५७

# आतुरता आणि तृप्ति

आतुरता अन् तृप्ती ह्यांतिल
अंतर किति रे ? सांग राजसा
आतुरतेंतिल कंप हृद्य का–
तृप्तीमधलें स्थैर्य रम्य रे ?

आतुरता ही अधीर हळवी
गोड मधाचे थेंब ठिबकते
आणिक तृप्ती म्हणजे राजा
थेंब मधाचा गिळलेला रे.

थेंबाथेंबांनीं गळणाऱ्या
मधास पाहुनि मिटक्या मारित
बघणारा अनुभवतो रुचिसुख
मनांतल्या मनिं शंभरदां रे.

थेंब मधाचा गिळल्यानंतर
रुचिसुख भोगुनि सरल्यानंतर
आतुरतेंतिल ना कातरता
तृप्तीमधली शांतिच केवळ.

थेंब मधाचा गिळलेला रे
रुचिसुख देई एकदांच तो
पुन्हां पुन्हां घुटके घेउनियां
उत्कटता ना फिरुनि यायची.

तृप्तीमधली तुष्टी असली
हळव्या हृदया लावी हुरहुर
आतुरतेंतिल कंप मनोहर
वाटे पुन्हां हवाहवासा.

थेंबाथेंबांनी गळणारा
अमृतमय मध गोड गोड तो
पाहुनि सुटलें पाणी तोंडा
कंप हृद्य तो तृप्तीहुनि रे.

आतुरता रमणीय हृद्य ही
तुझ्या कोंवळ्या मना रुचेना
थांब जरा धर धीर राजसा
नको झुरूं रे तृप्तीखातर.

ता. १५-२-५७

# खपुष्प

शुद्ध प्रीतिची तृप्ती सखया
अथांग नभ जणुं निळें निळें रे
आदि अंत राजसा तयाचा
शोधुनिही ना सांपडायचा.

परंतु राजा शुद्ध प्रीत रे
खपुष्प दुर्मिळ गगनींचें रे
तया गवसणी घालुनि धरणें
खरेंच राजा नाहीं सोपें.

तुझ्या कोंवळ्या हातांनीं तूं
खपुष्प दुर्लभ – पकडशील का ?
आणि तृप्तिचा भव्य नीलिमा
दावुनियां मज दिपवशील का ?

नाजुक कोमल शिरावरी तव
भार थोर मज सुखवायाचा
भार थोर मज हंसवायाचा
भार थोर मज कवळायाचा.

सांग राजसा – भोळी धरती
आणि निळें नभ मिळतें कोठें ?
दाखिव मजला सख्या जिवलगा
सोनेरी तें क्षितिज स्पर्शुनी.

भोळी धरती – प्रीती अपुली
आणि निळें नभ तृप्ती अपुली
मीलनरेषा दोहोंची रे
असीम सोनेरी क्षितिजापरि.

अमित अमित ही मीलनरेषा
अलोट प्रीती – अपार तृप्ती
स्पर्शुनि ह्या तिन्हि तेजोरेखा
संतुष्टचि रे तूं मी दोघें.

दिव्य अलौकिक तृप्तीची ह्या
ना यायाची कुणा कल्पना
अलभ्य – सुंदर खपुष्प अपुलें
मंगल करमीलनीं उगवलें !

ता. १५–२–५७

# अभय-वचन

आसुं अकारण ओघळणारे
हांसुं अचानक खळखळणारें
मदनाची ही बाधा असली
ना तुज शिवली अजुनि राजसा.

हृदय अकारण धडधडणारें
हात अकारण थरथरणारे
अबोल वाणी– नजर चोरटी
नाहीं तुजमधिं कधीं पाहिली.

श्वास अकारण ऊन ऊन ते
निमिषार्धीं निवुनी जाणारे
आणि निरर्थक शब्द कांहितरि
नाहिं बोळले तुझ्या मुखीं कधिं.

हंसणें– रडणें– फिरणें– वदणें
होइ अकारण सारें सारें
निष्क्रिय गतिशून्यता अशी ही
छे– छे ना तुज स्पर्शिल कधिं ही.

झोंप अकारण चाळवणारी
स्वप्नें दिवसां सतावणारीं
भयाण पोकळि खोल अंतरीं
ना तुज कधिंही जाणवली रे.

नेत्र सशापरि बावरणारे
काळिज भित्र्या हरणाचें रे
उगिच मंद- जड पडाति पावलें
छे- छे ना तुज माहित तसलें.

असल्या दोषी कामज्वरानें
पछाडतें दुर्बल मन केवळ
तुझ्या कोंवळ्या देहीं राजा
निवास सुदृढ गुणि हृदयाचा.

तुझ्या कोंवळ्या बाहूंमधिं मज
घट्ट लपेटुनि घेतांनाही
नाहिं थरकला हात तुझा मुळिं
दिलेंस जणुं तूं अभय-वचन रे.

ता. १५-२-५७

# दिव्यास जळत्या साक्ष ठेवुनी

आणभाक अपुली प्रीतीची
दिव्यास जळत्या साक्ष ठेवुनी
थरारलीं दो हृदयें राजा
थरथरली ज्योतही उगिच रे.

मंगल ज्योतीच्या साक्षीनें
म्हटलें मध तूं माझा केवळ
आणिक संबोधन माझें हें
स्वीकारशि तूं हास्यमुखानें.

पहिल्यावहिल्या नवथर कंवळ्या
प्रीतीनें उजळलें हास्य तें
त्या हास्याच्या उज्ज्वलतेनें
मीहि उजळ नखशिखांत बघ रे.

तुझ्या कोंवळ्या गालावरची
लोभस लाली गोड गुलाबी
पुन्हां पुन्हां सांगते बजावुनि
प्रामाणिक मी नसांनसांतुनि.

घट्ट पकड हाताची तुझिया
म्हणे अचळ ग माझी निष्ठा
कोमल विळखा घालुनि सांगशि
ना सोडिन तुज कालत्रयींही.

आणि एकदां- आठव राजा
प्रणयाचा आवेग लपविण्या
ह्याच दिव्याची मदत घेउनी
मालविला तूं प्रकाश लगबग.

त्याच क्षणीं मीं मनिं आठवली
आणभाक ती अपुली पहिली
उज्ज्वल ज्योतीनेंच पाहिली
भेट आपुली पहिलीवहिली.

दिव्यास जळत्या साक्ष ठेवुनी
सहजीं घडली ओळख अपुली
त्याच दिव्यानें पाहियली मग
प्रीतिंत झाली मोहक परिणति !

ता. १५-२-५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 22996 वि: ३/८५
क्रमांक 93660 नोंः दिः 3/8/80

# मधामधिंच तव सारें सारें !

कणाकणांनीं मध सांठवितां
मधमाशी ना शिणली कधिंही
तुझा गोडवा गोळा करुनी
मीही ना कधिं दमावयाची.

रंग रूप नि सुगंध मोहक
मधमाशीला ना जाणवतो
दिसे तिला मध पुष्पामधला
अल्पस्वल्प तो असो कितीही.

तसेच राजा तुझ्या ठायिंचे
विकार बहुविध ना मज दिसती
षड्रिपुंमधली टिपतें गोडी
अल्पस्वल्प ती असो कितीही.

सानसान थेंबांनीं हळुहळु
सांठे पोळें भलें थोरलें
तसाच राजा माझ्यापाशीं
तुझ्या गुणांचा संचय जमला.

पुसो कधींही पुसो कुणींही
आठवती मज सद्गुण तव रे
क्षणोक्षणीं अन् घडोघडीं जे
प्रकटुनि मजला सुखवुनि जाती.

मधमाशी मी दिसतो मजला
पुष्पामधला मधकण केवळ
तुझ्या कोंवळ्या व्यक्तित्वांतिल
प्राशियली मीं माधुरि केवळ.

मधमाशी मी– तूं मध माझा
माझ्या लेखीं तूं लडिवाळा
मधमय नुसता– मधमय नुसता
गोड आंतुनी बाहेरुनिही.

लाडेंलाडें विचारशी तूं
काय रुचे तुज माझ्यामधलें ?
कसें देउं रे उत्तर राजा ?
मधामधिंच तव सारें सारें !

ता. १६–२–५७

# अरुणोदय

भल्या पहाटे दारीं तुझिया
वाजविली मीं कडी कितीदां
नाहीं आली जाग तुला परि
म्हणुनी फिरलें मी माघारीं.

तुझी गुलाबी साखरझोंपहि
दिली असति मीं मधीं कालवुनि
आणि मधुर सुखस्वप्नांमधिंही
सुधा मूर्त मीं ओतिलि असती.

नाहिंच आली जाग तुला परि
स्वस्थ झोंपशी शांत सुखानें
आळवितां मज जाग्रण रात्रीं
आणि पहाटें गाढ झोंप ही.

जातें आतां जातें परतुनि
येईन पुन्हां सायंकाळीं
रुसशिल तोंवर माझ्यावरती
जागविलें ना तुजला म्हणुनी.

तुझ्या कोंवळ्या देहीं राजा
यौवन संवेदन बघ निजलें
वाजवितें मी कडी कितीदां
नाहीं येतचि जाग तुला परि.

किशोर तूं रे कंवळा कंवळा
प्रभातकाळचि जणुं सोनेरी
घाई ना तुज उठावयाची
तरिहि प्रीत मम पुकारि तुजला.

ना येतां तुज जागृति मुळिंही
जाइन जर का मी परतोनी
होशिल जागा ऊन तापतां
झुरशिल कंवळ्या किरणांखातर.

सख्या जिवलगा– रे लडिवाळा
ऊठ पहा– अरुणोदय हंसरा
ना तरि किरणहि खरखरणारे
टाकतील वेढुनी आपणां !

ता. १८-२-५७

22996 वि: 07/84
1388 नों: दि: 3-7-88

# तशीच तुजसम हंसुनी फसतें !

सहज भेटतां हंसलों राजा
सान निरागस बाळांपरि रे
घडिभर गेलों विसरुनि तूं मी
गुपितें अपुलीं दोघांमधलीं.

गुपितें अपुलीं दोघांमधलीं
सुखविति जीं रे दिवस उजेडीं
त्याच सुखांना रात्रीं राजा
पडती सहस्र रेशिमगांठी.

गोड मधामधिं भिजलेल्या तव
स्पर्शाची पखरण अंगावरि
तेंच सुखद संवेदन रात्रीं
विरहानें रे जातें विरुनी.

तुझ्या मधाची अवीट माधुरि
नाहिं चाखिली निवांत रात्रीं
म्हणुनि राजसा पहा उशा ह्या
मलूल माझ्या निःश्वासांनीं.

कढत उसासे ऊन ऊन रे
उशीनेंच ह्या सदा झेलिले
नाहीं चाहुल तुला राजसा
भेटतांच तूं सहज हांसतें.

तुला पाहतां जातें विसरुनि
विरहव्यथा रात्रींची ताजी
मधमय तुझिया हास्यावांचुनि
दुजें कांहिं मज मुळीं न दिसतें.

सांग राजसा – आणशि कुठुनी ?
हास्य लाघवी मधिं बुडलेंलें
हवें झुराया मीलनतिथिस्तव–
सांग लाडक्या – कसें विसरशी ?

हास्य निरागस बाळापरि तें
पाहुनि पुरती भारुनि जातें
आणिक नकळत मीहि राजसा
तशीच तुजसम हंसुनी फसतें.

तूं हंसतांक्षणिं मीही हंसतें
खरेंच राजा – खरेंच फसतें
मूकच माझी विरहव्यथा मग
व्यक्त व्हावया तडफडते रे.

मला पाहतां दिलेंस उधळुनि
सदाचेंच तें हास्य मुलायम
त्या हास्याच्या अमृतलहरी
जाळिति रात्रीं शय्येवरि परि !

ता. २३–२–५७

दा. क्र. ८३२५

# साखरपुडा

अपुला साखरपुडा कराया
साखर सारी तुझीच राजा
केवळ कागद पुडा बांधण्या
घेउनि आलें मी रे लगबग.

तुझीच साखर – तुझीच सारी
कागद केवळ माझ्याजवळी
कोरा कागद घेउनि राजा
लिहिली त्यावरि प्रीतकहाणी.

नव्हती साखर माझ्यापाशीं
परंतु गोडी तिची सेवुनी
जें तृप्ती-संवेदन लाभे
तेंच कागदावरी उमटलें.

तुझीच साखर – तुझीच राजा
तृप्तीचा परि कागद माझा
असा गोड रे गोडच अवघा
अपुला साखरपुडा राजसा !

ता. २४-२-५७

अनुक्रम 22996
क्रमांक 9386
दि. 9/04

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

REFBK-0009395
REFBK-0009395